






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २४.०६.२०२६ | अंक नं. ०७२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020








# अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अमली पदार्थांची खुलेआम सर्रास विक्री

## जिल्ह्याचा 'उडता पंजाब' करु नका; पोलिस अधीक्षकांनी 'सुदर्शन चक्र' फिरवून विक्रेत्यांवर कडक कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार : भाजपा

नगर – जिल्ह्यात व शहरात सर्वच भागांमध्ये सर्रास अमली पदार्थांची विक्री होत असल्याने तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहे. तरुणांच्या व्यसनाधीनतेमुळे मोठ्या प्रमाणात गुन्हेही घडत असल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशाचे भविष्य असणारी तरुण पिढी अशी वाया गेली तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल. त्यामुळे पोलीस प्रशासनाने तातडीने जिल्ह्यात अमली पदार्थ विक्रेत्यांना पकडून त्यांच्यावर कडक कारवाई करावी. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे जिल्ह्याचा 'उडता पंजाब' करू नका. पोलीस अधीक्षकांनी सर्व अवैध धंद्यांवर आपले 'सुदर्शन चक्र' त्वरित फिरवावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या वतीने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली.


अहिल्यानगर शहर व जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्ह्यात सर्वत्र होत असलेल्या अमली पदार्थांच्या विक्री विरोधात व तरुणांमध्ये वाढत चाललेल्या व्यसनाधिनतेमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाने त्वरित याविरोधात संबंधितांवर कडक कारवाई करावी, या मागणीसाठी पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा काढला. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यावेळी उपलब्ध नसल्याने संतप्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या दारातच धरणे आंदोलन करत तिय्या दिला. शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी सुमारे दोन तास आंदोलन केले. आंदोलनात शहर व जिल्ह्यातील पदाधिकारी, नगरसेवक, महिला पदाधिकारी, युवा उपस्थित होते. यावेळी 'युवाशक्ती बचाओ... देश बचाओ...', 'अमली पदार्थ हद्दपार झालेच पाहिजे', 'दारु बंदी, हप्ते बंदी झालीच पाहिजे' अशा घोषणा दिल्या.

यावेळी पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी जिल्ह्यात अमली पदार्थाविरोधात विशेष मोहीम त्वरित सुरु करू, असे आश्वासन देऊन संबंधितांवर कडक कारवाई करू असे सांगितले.

यावेळी अनिल मोहिते म्हणाले, अमली पदार्थ सहज कुठेही टपऱ्यांवर उपलब्ध होत असल्याने तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे. त्यामुळे अनेकांनी आत्महत्या केली असून, अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. वाढत्या व्यसनाधिनतेमुळे जिल्ह्याचा 'उडता पंजाब' होतो की काय ? असा धोका निर्माण झाला आहे. नव्या पिढीला वाचवण्यासाठी ही व्यसनाधिनता कमी करणे आवश्यक आहे. अमली पदार्थांच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी पोलीस प्रशासनाने शाळा, महाविद्यालयांमध्ये बैठका घ्याव्या तसेच पानटपऱ्यांची तपासणी करावी. मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जसे अमली पदार्थ विरोधात कारवाई करण्याचे आदेश देऊन विशेष पथक निर्माण केले तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातही करावे, अशी मागणी करून अमली पदार्थ व अवैध धंद्यांवर पोलीस अधीक्षक यांनी आपले 'सुदर्शन चक्र' फिरवावे व हे धंदे बंद करावेत अन्यथा शांत न बसता याहून अधिक तीव्र आंदोलन करेल व प्रसंगी कायदाही हातात घेईल, असा इशारा दिला.

दिलीप भालसिंग म्हणाले, पोलीस प्रशासनाच्या हलगर्जीमुळे जिल्ह्यात अवैध धंदे व आमली पदार्थांची विक्री जोमात आहे. हे अवैध धंदे त्वरित बंद झाले पाहिजे. मात्र पोलीस प्रशासनच अवैध धंदे करणाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. हे चुकीचे असून त्वरित थांबले पाहिजे. भाजप आता शांत बसणार नाही.

प्रास्ताविक जिल्हा सरचिटणीस निखिल वारे यांनी केले. यावेळी महिला आघाडीच्या अध्यक्षा प्रिया जानवे, युवा मोर्चा अध्यक्ष ऋद्रेश अंबाडे, नगरसेवक उदय कराळे, राहुल शिंदे, बाबासाहेब सानप, वैशाली चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. *(छायाचित्र पान २ वर)*




# अहिल्यानगर जिल्ह्यात रात्रभर पावसाची संततधार

नगर – जिल्ह्यात गेल्या २४ तासात अनेक भागात रात्रभर पावसाची संततधार पाहायला मिळाली. २४ जून रोजी सकाळी १० वाजता प्रशासनाने घेतलेल्या नोंदीनुसार, मागील २४ तासात नेवासा तालुक्यात जिल्ह्यातील सर्वाधिक २३.८ मिमी पावसाची नोंद झाली. मात्र, हा पाऊस पेरणीयोग्य नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाई करु नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

२३ जून रोजी मान्सून दाखल झाल्यानंतर रात्रभर अनेक भागात संततधार पाऊस सुरु होता. मागील २४ तासात नेवाशाखालोखाल नगर तालुक्यात १७.७ मिमी, पारनेरमध्ये १७.५ मिमी, पाथर्डीमध्ये १७.२ मिमी, शेवगावमध्ये १३.० मिमी तर जामखेड तालुक्यात ११.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असला, तरी जिल्ह्याच्या सर्व भागांत सारखा पाऊस झालेला नाही.

एकिकडे दक्षिण जिल्ह्यात पावसाने चांगली हजेरी लावली असताना उत्तर जिल्ह्यात मात्र जून महिन्यातील सरासरीच्या तुलनेत पावसाचे प्रमाण नगण्य आहे. राहुरी, राहाता, अकोले आणि कोपरगाव या तालुक्यांमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. राहुरी तालुक्यात आतापर्यंत अवघा ७.४ मिमी पाऊस झाला असून, तो जिल्ह्यातील यंदाचा निचांकी पाऊस ठरला आहे. याशिवाय राहाता तालुक्यात ९ मिमी, अकोले तालुक्यात १०.६ मिमी आणि कोपरगाव तालुक्यात १२.२ मिमी इतका अल्प पाऊस नोंदवला गेला आहे. २४ जून रोजीच्या २४ तासात जरी काही भागांत कमी पाऊस झाला असला, तरी जून महिन्यातील एकूण सरासरी पाहता कर्जत तालुक्यात आतापर्यंत सर्वाधिक ८० मिमी पावसाची नोंद झाली आहे. तर नगर शहर व तालुक्यात जून महिन्यात आतापर्यंत एकूण ४४ मिमी पाऊस झाला आहे.

जिल्ह्यात रात्रभर संततधार पाऊस झाला असला तरी हा पाऊस पेरणीयोग्य नाही. त्यामुळे घाईगडबडीत पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याची भीती आहे. जमिनीतील ओलावा तपासून आणि पुरेसा पाऊस झाल्यावरच पेरण्या कराव्यात. १०० ते १२५ मिमी पाऊस झाल्याशिवाय पेरणी करु नये, असे आवाहन नगर तालुक्याचे प्रभारी कृषी अधिकारी अशोक वाळके यांनी केले आहे. दरम्यान कृषी विभागाकडून खरीप हंगामाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी पिक नियोजन कसे करावे, याबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात आली आहे. याशिवाय माती परीक्षण मोहिम, बीज प्रक्रिया, बियाणे उगवण क्षमता तपासणे, याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. ऑनलाईन पोर्टलवर निवड झालेले शेतकरी, शेतकरी गट यांना तूर, मूग बियाण्यांचे मिनिकीट मोफत वाटप सुरु आहे. तर प्रमाणित बियाणे अनुदानावर वाटप केले जात आहे, अशी माहिती वाळके यांनी दिली.

**तालुकावार पाऊस**

| तालुका | पाऊस |
|---|---|
| नगर | १७.७ |
| पारनेर | १७.५ |
| श्रीगोंदा | ४.२ |
| कर्जत | २.६ |
| जामखेड | ११ |
| शेवगाव | १३ |
| पाथर्डी | १७.२ |
| नेवासा | २३.८ |
| राहुरी | ५.९ |
| संगमनेर | ४.९ |
| अकोले | ९.४ |
| कोपरगाव | ४.१ |
| श्रीरामपूर | ८.३ |
| राहाता | ७.६ |
| अ.नगर जिल्हा | ११ |


**पाहिजेत**

सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे.

आकर्षक पगार

भेटा : कोहिनूरसमोर, कापडबाजार, अहिल्यानगर

9356352421






**प्रॉपर्टी विषयी विश्वसनीय व्यवहारासाठी...**

तेजस कोठारी यांचे

**नमीत प्रॉपर्टीज्**

(नगर - पुणे - मुंबई - दुबई)

8421953963




जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


## घराचे कुलूप तोडून पैसे व दागिन्यांची चोरी; संशयित ५ महिला चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर - तपोवन रोडवरील शिवाजीनगर भागात एका बंद घराचे कुलूप तोडून महिला चोरट्यांनी रोख रक्कमेसह सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

शिवाजीनगर येथील हनुमान मंदिरासमोरील एका अपार्टमेंटमध्ये राहणारे सेवानिवृत्त नागरिक सचिन बाबासाहेब दहीफळे यांच्या घरात ही चोरी झाली. सायंकाळच्या सुमारास दहीफळे कुटुंब काही कामानिमित्त बाहेर गेले असताना, संशयित आरोपी महिला स्वाती बाबासाहेब सोनवणे हिने तिच्या इतर चार अनोळखी महिला साथीदारांसह घरात प्रवेश केला. या महिलांनी बेडरूममधील कपाटाचे कुलूप तोडून आतील ९ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम आणि ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने ज्यात बोरमाळ, मंगळसूत्र, अंगठी आणि कानातले जोड होते, असा एकूण ९९ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर न्यायालयाच्या आदेशावरून तोफखाना पोलीस ठाण्यात संशयित स्वाती सोनवणे आणि तिच्यासोबत असलेल्या इतर चार अज्ञात महिलांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास महिला पो.ना. जिजाबाई खुडे या करत आहेत.



### पावसामुळे शहरातील रस्त्यांवर साचले तळे

पावसाला सुरुवात झाली असून, मान्सूनच्या पहिल्याच पावसात अहिल्यानगर शहरातील अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाण्याचे तळे साचलेले दिसून आले. या पाण्यातून मार्ग काढताना नागरिक व वाहन चालकांना कसरत करावी लागत होती. शहरातील अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचले होते. पाण्याचा निचरा करण्याची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील तेलीखुंट चौकातील हे दृष्य. महापालिका प्रशासनाने याकडे लक्ष देवून पाणी निचरा होण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. (छाया- धनेश कटारिया)

## मोहरम विसर्जन मिरवणूक मार्गावर पोलिसांचा रूट मार्च

**पोलीस अधिक्षक सुदर्शन यांच्यासह कोतवाली, तोफखाना, भिंगार पोलिसांचा सहभाग**

नगर - नगर शहरात मोहरमच्या पार्श्वभूमीवर २५ जून रोजी निघणारी कत्तलची रात्र मिरवणूक व २६ जून रोजी निघणारी विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. या दोन्ही मिरवणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी मिरवणूक मार्गावर पोलिसांनी २४ जून रोजी दुपारी रूट मार्च काढला.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्यासह अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, कोतवालीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, तोफखान्याचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, भिंगार कॅम्पच्या स.पो.नि. तेजश्री थोरात यांच्यासह तिन्ही पोलीस ठाण्यांचा मोठा फौजफाटा या रूट मार्च (संचलन) मध्ये सहभागी झाला होता.



मोहरम विसर्जन मिरवणूक मार्गावर रूट मार्च मध्ये सहभागी झालेले पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सह कोतवाली, तोफखाना, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलीस अधिकाऱ्यांच्या समवेत २ दिवसांपूर्वीच दोन्ही मिरवणूक मार्गांची आणि संवेदनशील भागांची दुचाकीवरून पाहणी केली होती. मिरवणूक मार्गांची त्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन माहिती घेत गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील मार्गांवर पोलीस बंदोबस्ताचे नियोजन तपासले होते. त्यानंतर पुन्हा आज सर्व मार्गावर पायी फिरून संचलन केले आहे. या मार्गांवर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. दोन्ही मिरवणुका पारंपारिक मार्गाने काढण्यात येणार आहेत.

**कत्तल की रात मिरवणूक मार्ग**

कोठला मैदान- फलटन चौकी-बारा इमाम हवेली- मोठी सवारी समेत मंगलगेट- दाळमंडई- तेलीखुंट- कापड बाजार - शहाजी चौक- मोची गल्ली- आचार्य गुंदेचा चौक- जुना कापड बाजार- भिंगारवाला चौक- अर्बन बँक रोड- लक्ष्मीबाई कारंजा - कोर्टची मागील बाजुस सबजेल चौक- मनपा चौक- पंचपिर चावडी- जुना बाजार रोड- धरती चौक- हातमपुरा- हावरे गल्ली- नालबंद खुंट- रामचंद्र खुंट- किंग्स गेट हवेली- कोंड्या मामा चौक- फलटण चौकी.

**मोहरम विसर्जन मिरवणूक मार्ग**

कोठला-फलटन चौकी- बारा इमाम हवेली- मंगलगेट- आडतेबाजार- पिंजारगल्ली- पारशाखुंट- जुना कापड बाजार - देवेंद्र हॉटेल ख्रिस्त गल्ली-बुरुड गल्ली- जुना बाजार- पंचपीर चावडी- मनपा- दो बोटी चिरा मशीद- कोर्टाच्या मागील बाजूने- चौपाटी कारंजा- दिल्ली गेट- नीलक्रांती चौक- बालिकाश्रम रोड-बारा इमाम बारव व सावेडी गाव.

## नगर-पुणे महामार्गावर लुटमार करणारी ५ जणांची टोळी पकडली

नगर - नगर - पुणे महामार्गावरील गव्हाणवाडी शिवारात कार चालकाला अडवून बेदम मारहाण करत तब्बल २ लाख ४७ हजार रुपयांची रोकड लुटणाऱ्या टोळीचा बेलवंडी पोलिसांनी अवघ्या २ दिवसांत छडा लावत पाच आरोपींना अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबतची माहिती अशी की, पनवेल येथील बबन मल्हारी औटी (वय ४५) हे आपल्या मूळ गावी नांदा (ता. आष्टी, जि. बीड) येथे जाऊन परतत असताना २१ जून रोजी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास गव्हाणवाडी शिवारातील स्वामी समर्थ हॉटेलसमोर लघुशंकेसाठी थांबले होते. यावेळी ६ ते ७ जणांच्या टोळीने त्यांना घेरले. गाडी येथे का थांबवली? असा जाब विचारत वाद घालत आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.



यानंतर आरोपींनी त्यांच्या इनोव्हा गाडीचा दरवाजा उघडून डॅशबोर्डमध्ये ठेवलेली २ लाख ४७ हजार रुपयांची रोकड जबरदस्तीने काढून घेतली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी औटी यांना त्यांच्या गाडीत बसवून शिरूरच्या दिशेने नेले व तेथे सोडून पळ काढला. जखमी अवस्थेत औटी यांनी ११२ हेल्पलाईनवर संपर्क साधत मदतीची मागणी केली. माहिती मिळताच बेलवंडी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. फिर्यादीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली तपास सुरू असताना गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सुरज अविदास ओहोळ, संकेत रमेश शेळके, शुभम दिलीप गायकवाड, क्षितिज दादासाहेब ओहोळ आणि मयूर तुळशीराम ओहोळ यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली बेलवंडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, पोलीस उपनिरीक्षक मोहन गाजरे व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

नगर - भाडोत्री खोलीत राहात असलेल्या महिलेच्या घरात बेकायदेशीरपणे घुसून अश्लील वर्तन करत तिचा विनयभंग केल्याची आणि तिच्या आईवडिलांना मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील खडकी येथे २२ जून रोजी घडली. याप्रकरणी तीन आरोपींविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला तिच्या घरात असताना आरोपी सचिन विलास उमाप, अक्षय विलास उमाप आणि दिनकर राहुल हे त्या ठिकाणी आले. त्यांनी महिलेला 'तू येथे राहायचे नाही, येथून निघून जा' असे म्हणत हुज्जत घालण्यास सुरुवात केली. त्यावर महिलेने 'मी येथून का जाऊ? ही माझी जागा आहे, तुम्ही माझ्या घरात कसे आले?' असे ठणकावून सांगितले. या गोष्टीचा राग आल्याने आरोपी सचिन उमाप याने महिलेच्या तोंडात मारले व तिघांनी तिच्याशी लज्जास्पद वर्तन करत तिचा विनयभंग केला. तसेच पीडितेच्या आई-वडिलांना ही शिवीगाळ करत मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.



अमली पदार्थांची सर्रास होत असलेली विक्री व वाढत्या व्यसनाधिनतेच्या निषेधार्थ पोलीस अधीक्षक कार्यालयावर धडक मोर्चा काढून भाजप पदाधिकाऱ्यांच्यावतीने पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांनी ठिय्या आंदोलन केले.

## कंपनीची फ्रँचायझी देण्याच्या बहाण्याने तिघांकडून व्यावसायिकाची ५.५० लाखांची ऑनलाईन फसवणूक

नगर - डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रेंचायझी देण्याच्या बहाण्याने एका मेडिकल दुकानदाराची तब्बल ५ लाख ५० हजार रुपयांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगरच्या सायबर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध फसवणुक आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संगमनेर येथील पावबाकी रोड परिसरातील रहिवासी आणि मेडिकल व्यावसायिक महेश रामनिवास मुंदडा यांना संगमनेर येथे डिलीव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रेंचायझी घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी इन्स्टाग्रामवर आलेली जाहिरात पाहून त्यावरील लिंक वर आलेला एक अर्ज भरून आपली माहिती दिली होती. त्यानंतर मयांक गुप्ता, परमार नावाचा व्यक्ती आणि प्रियांका नावाच्या महिलेने मुंदडा यांच्याशी वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून संपर्क साधला. या तिघांनी संगनमत करून फ्रेंचायझी देण्याच्या नावाखाली मुंदडा यांचा विश्वास संपादन केला.

त्यानंतर विविध कारणांसाठी पैसे भरण्यास सांगून मुंदडा यांच्याकडून ५ लाख ५० हजार रुपये उकळले. पैसे भरूनही फ्रेंचायझी न मिळाल्याने आणि संशयास्पद ईमेल आयडीवरून संपर्क होत असल्याने आपली फसवणूक झाल्याचे मुंदडा यांच्या लक्षात आले. अखेर महेश मुंदडा यांनी सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी मयांक गुप्ता, परमार आणि प्रियांका यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले करत आहेत.

## आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप अखेर स्थगित

**परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आश्वासनानंतर २४ जूनपासून कामकाज सुरु**

नगर - आरटीओ कर्मचाऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असणाऱ्या मागण्यांसाठी गेल्या ८ दिवसांपासून सुरू असलेला बेमुदत संप अखेर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आश्वासनानंतर स्थगित करण्यात आला. परिवहन मंत्री सरनाईक यांच्यासोबत मंत्रालयातील दालनात झालेल्या सकारात्मक चर्चे नंतर २४ जूनपासून कामकाज पूर्ववत करण्याचा निर्णय संघटना प्रतिनिधींनी घेतला आहे.



८ दिवसांच्या संपानंतर अहिल्यानगर आरटीओ कार्यालयातील कामकाज २४ जूनपासून पूर्ववत सुरु झाले.

विविध प्रलंबित मागण्यांसाठी १६ जूनपासून संपूर्ण राज्यातील आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर गेले होते. अहिल्यानगर आरटीओ कार्यालयातील कर्मचारी राजेंद्र तेजाळे, कैलास मिसाळ, रतन कासार, सारंग पाटील, तुषार इंगळे, निमसे, गावडे यांनी यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनीही या संपात सहभाग घेतला होता. हा संप मिटवण्यासाठी महाराष्ट्रातील ३१ आमदार व खासदारांनी परिवहन मंत्र्यांना विनंती पत्रे दिली होती. तसेच विधानसभा अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर लक्षवेधीसारख्या आयुधांचा वापर करण्याची तयारीही अनेक आमदारांनी केली होती. या पार्श्वभूमीवर २३ जून रोजी संघटना प्रतिनिधींना मंत्रालयात चर्चेसाठी आमंत्रित करण्यात आले होते.

राज्य शासकीय कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस विश्वास काटकर यांनी या महत्त्वपूर्ण चर्चेचे नेतृत्व केले. प्रशासनाकडून पदोन्नती, प्रतिनियुक्ती व सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना यांसारख्या विषयांवर कसे नकारात्मक धोरण अवलंबिले जाते आणि प्रचलित नियमांना बगल देऊन कर्मचाऱ्यांना लाभांपासून कसे वंचित ठेवले जाते, याचे सविस्तर सादरीकरण पुराव्यांसह मंत्र्यांसमोर करण्यात आले.

कर्मचाऱ्यांच्या मागण्या ऐकल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी परिवहन आयुक्तांच्या अधिकार कक्षेतील पदोन्नतीचा प्रश्न पुढील दोन दिवसांत मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. उर्वरित प्रश्नांबाबत येत्या १५ दिवसांत कर्मचारीभिमुख निर्णय घेतले जातील आणि आयुक्त स्तरावर चर्चा करून ते प्रश्न मार्गी लावले जातील. संघटनेसह झालेल्या या चर्चेच्या अनुषंगाने मान्य झालेल्या ठरावांची अधिकृत घोषणा २४ जून रोजी विधानसभा अधिवेशनात मंत्री सरनाईक यांनी केली.

मंत्री सरनाईक यांनी दिलेल्या आश्वासनानंतर संघटनेच्या पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. उर्वरित मागण्यांवर अतिशीघ्रतेने कार्यवाही करण्यासाठी प्रशासनाला काही कालावधी देण्याबाबत सर्व कार्यकर्त्यांचे एकमत झाले. त्यानुसार, गेले ८ दिवस सुरू असलेला हा बेमुदत संप २४ जूनपासून स्थगित करण्याचा निर्णय सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांनी घोषित केला. तसेच संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी संपात सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

### नगर-पुणे रोडवर अपघात; तरुणाचा मृत्यू

नगर - नगर - पुणे महामार्गावर सुपा (ता. पारनेर) येथील पंचशील हॉटेलजवळ झालेल्या एका भीषण रस्ता अपघातात २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. आयुष दिलीप चव्हाण (रा. सुपा, ता. पारनेर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मयत आयुष हा २३ जून रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास नगर - पुणे महामार्गाने मोटारसायकल वर जात असताना पंचशील हॉटेलजवळ त्याचा रस्ता अपघात झाला. अपघातानंतर गंभीर जखमी झालेल्या आयुष याला तात्काळ रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, हॉस्पिटलमध्ये पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी त्याला तपासून सकाळी ११. २७ वाजता मृत घोषित केले. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### विनोद बाबर यांचे अल्प आजाराने निधन

राहाता - राहाता शहरातील नामवंत फरसाणचे संचालक विनोद लक्ष्मण बाबर (वय ५७) यांचे १६ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर राहाता अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा,१ मुलगी असा परिवार आहे. शंकर, संजय बाबर यांचे ते बंधू तर सनी बाबर यांचे ते वडील होत.

## बालविवाहांना आळा घालण्यासाठी लग्नपत्रिकेवर वधू-वराची जन्मतारीख छापणे होणार अनिवार्य!

मुंबई - राज्यातील बालविवाहाची कुप्रथा समूळ नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र सरकार लवकरच निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. यापुढे लग्नाच्या निमंत्रणपत्रिकेवर वधू आणि वर या दोघांच्याही नावापुढे त्यांची जन्मतारीख स्पष्टपणे छापणे अनिवार्य करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने राज्य सरकारला दिला असून, त्याबाबत सरकार विचाराधीन आहे. राजस्थान सरकारने हा नियम आधीच लागू केला असून, आता महाराष्ट्रही त्याच धर्तीवर पाऊल उचलणार आहे, असे २४ जून रोजी महिला व बालविकास विभागाने विधानसभेत लेखी उत्तरात स्पष्ट केले आहे.

महिला व बालविकास विभागाकडून राज्यातील बालविवाहांच्या गंभीर परिस्थितीकडेही लक्ष वेधण्यात आले आहे. विधानसभेत सादर करण्यात आलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, राज्यातील बालविवाहाचे प्रमाण अजूनही धोकादायक पातळीवर असल्याचे समोर आले आहे. सरकारने दिलेल्या माहितीनुसार परभणी जिल्ह्यात ४८ टक्के मुलींचे विवाह १८ वर्षांपूर्वी होतात. तर हेच प्रमाण बीड जिल्ह्यात ४३.७ टक्के, धुळे जिल्ह्यात ४०.५ टक्के, सोलापूर जिल्ह्यात ४०.३ टक्के आहे. राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांतही ही परिस्थिती गंभीर असून, बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि एकूणच विकासावर अत्यंत घातक परिणाम होत असल्याचे महिला व बालविकास विभागाने विधानसभेत दिलेल्या लेखी उत्तरात स्पष्ट केले आहे.

दरम्यान राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने सरकारच्या महिला व बालविकास विभागाकडे दाखल केलेल्या प्रस्तावावर शासन गंभीरपणे विचार करीत असल्याचेही सांगण्यात आले. या प्रस्तावानुसार लग्नपत्रिकेवर मुलगा आणि मुलगी या दोघांच्या नावाखाली त्यांच्या जन्मतारखेचा उल्लेख करणे बंधनकारक असेल, लग्नपत्रिका छापण्यापूर्वी प्रिंटिंग प्रेस मालकांना वर-वधूच्या जन्म दाखल्याची किंवा अधिकृत ओळखपत्राची जन्मतारीख पडताळणी करणे आवश्यक असेल. ज्या मंगलकार्यालयात लग्न लावले जाणार आहे, त्या मंगल कार्यालयाच्या प्रशासनानेही वधू-वराचे वय कायदेशीर आहे की नाही, याची खात्री करावी, अन्यथा संबंधित प्रिटींग प्रेस, मंगल कार्यालय यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची शिफारस या प्रस्तावात करण्यात आली आहे. तसेच विवाह नोंदणी करताना पत्रिकेवरील जन्मतारीख आणि अधिकृत शासकीय कागदपत्रे यांची खातरजमा शासकीय यंत्रणेकडून केली जाणार आहे.

## शेतजमिनीच्या वादातून मारहाण

**रोकडसह १ लाख ८० हजारांचा माल केला लंपास, गुन्हा दाखल**

नगर - शेतजमिनीच्या वादातून एका वृद्ध शेतकरी महिला आणि त्यांच्या पुतण्याला बेकायदेशीर टोळी जमा करून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना नगर तालुक्यातील शेंडी शिवारात घडली आहे. या मारहाणीदरम्यान फिर्यादीच्या पुतण्याच्या खिशातील रोकड आणि शेतातील साहित्यासह एकूण १ लाख ८० हजार रुपयांचा माल जबरदस्तीने चोरून नेण्यात आला आहे. याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुशिला अरुण पुंड (वय ६१, रा. शेंडी, ता. नगर) यांनी २२ जून रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचा पुतण्या हे १२ जून रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास शेंडी गावातील शेत गट नंबर ३१२ मधील आपल्या शेतात गेल्या होत्या. यावेळी आरोपी दाऱ्या चव्हाण, नितीन सुंदर काळे, संजय दाऱ्या चव्हाण, दाऱ्या चव्हाण यांची पत्नी आणि त्यांच्यासोबत इतर एक पुरुष व तीन महिला (सर्व रा. पोखर्डी, ता. नगर) अशा ९ ते १० जणांच्या बेकायदेशीर टोळीने शेतात प्रवेश केला.

आमच्या शेतात बेकायदेशीररित्या का प्रवेश केला? असे विचारल्याचा राग आल्याने आरोपींनी सुशिला पुंड व त्यांचा पुतण्या अभिनव यांना लाथाबुक्क्यांनी व शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. तसेच अभिनव याच्या खिशातील ४ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतले. आरोपींनी शेतातील शेततळ्याचा कागद आणि सोयाबीनचे ३० कट्टे (एकूण किंमत १ लाख ८० हजार रुपये) जबरदस्तीने वाहनात भरून पळवून नेले. जाता जाता आरोपींनी, तुमच्याकडे अजून ४ लाख २० हजार रुपये राहिले आहेत, ते दिल्याशिवाय आम्ही येथून उठणार नाही. तुम्ही जर पुन्हा या शेतात आले, तर तुमचे हातपाय बांधून मारून टाकू, अशी धमकी फिर्यादींना दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### भिजवलेले बदाम बुद्धीला चालना

रोज सकाळी उठून मूठभर बदाम खा, बुद्धी तल्लख होईल हे वाक्य आपण लहानपणापासून ऐकत आलो. पण बदाम खाण्याची खरी पद्धत कोणती? तर ते रात्रभर पाण्यात भिजवून खाणे. आपल्या आजी-आजोबांनी सांगितलेला हा साधा घरगुती उपाय आज विज्ञानानेही मान्य केला आहे. भिजवलेले बदाम हे केवळ ड्रायफ्रूट नसून मेंदूसाठी एक टॉनिकच आहे. बदामाच्या कडक तपकिरी सालीमध्ये 'टॅनिन' नावाचे एक द्रव्य असते. यामुळे पोषक तत्वांचे शोषण नीट होत नाही. रात्रभर पाण्यात भिजवल्याने ही साल सहज निघते व टॅनिन निघून जाते. त्याचबरोबर भिजल्यामुळे बदामातील सुप्त एन्झाईम्स 'जागे' होतात. याला 'स्प्राउटिंग' म्हणतात. त्यामुळे बदाम पचायला हलके होतात व त्यातील सर्व जीवनसत्त्वे, खनिजे शरीराला पूर्णपणे मिळतात. बिदामात व्हिटॅमिन ई भरपूर असते. हे अँटीऑक्सिडंट मेंदूच्या पेशींचे संरक्षण करते व विस्मरणासारखे वयोमानानुसार होणारे आजार लांब ठेवते. मेंदूच्या विकासासाठी आवश्यक असलेले हे आम्ल बदामात असते. त्यामुळे एकाग्रता व स्मरणशक्ती वाढते. विद्यार्थ्यांसाठी हे खूप महत्वाचे आहे. रायबोफ्लेविन व एल-कर्निटीन ही दोन पोषकद्रव्ये मेंदूची कार्यक्षमता वाढवतात. रात्री ५ ते ७ बदाम एका वाटीत पाण्यात भिजत घाला. सकाळी उपाशीपोटी त्याची साले काढून चावून चावून खा. लहान मुलांना वाटून दुधातून देता येतील.

## पाककला

### मुंबई स्टाईल तवा पुलाव

**साहित्य :** बासमती तांदूळ १ वाटी, उकडलेला बटाटा १ मध्यम, उकडलेले मटार १/४ वाटी, बारीक चिरलेली शिमला मिरची १/२, बारीक चिरलेला कांदा १ मोठा, बारीक चिरलेला टोमॅटो १, बारीक चिरलेली फरसबी ८-१०, पावभाजी मसाला २ चमचे, लाल तिखट १ चमचा, हळद १/४ चमचा, जिरे १/२ चमचा, आले-लसूण पेस्ट १ चमचा, लोणी २ चमचे, तेल १ चमचा, मीठ चवीनुसार, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, लिंबू १/२

**कृती :** बासमती तांदूळ धुऊन ८०% शिजवून घ्या. भात मोकळा करून थंड होऊ द्या. मोठा तवा गरम करून त्यावर तेल व १ चमचा लोणी टाका. जिरे तडतडल्यावर कांदा परतून घ्या. कांदा गुलाबी झाल्यावर आले-लसूण पेस्ट परता. त्यात टोमॅटो, शिमला मिरची, फरसबी घालून २ मिनिटे परता. उकडलेला बटाटा कुस्करून व मटार घाला. आता पावभाजी मसाला, लाल तिखट, हळद, मीठ घालून मिश्रण एकजीव करा. मिश्रणाला तेल सुटू लागल्यावर शिजवलेला भात घाला. हलक्या हाताने सर्व एकत्र करा. वरून उरलेले लोणी, कोथिंबीर व लिंबाचा रस घाला. २ मिनिटे वाफ काढा. तयार तवा पुलाव गरम गरम कांदा-लिंबू व पापडाबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### घराचा मुख्य दरवाजा

* घराचा मुख्य दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा येते.

* दरवाज्यासमोर काटेरी झाडे, खांब किंवा कचराकुंडी नसावी. अडथळे प्रगती रोखतात.

* मुख्य दरवाजावर शुभ चिन्हे जसे स्वस्तिक, ॐ लावा. घराचे रक्षण होते.

* दरवाजा उघडताना व बंद करताना आवाज होणार नाही याची काळजी घ्या.

## सौंदर्य

* आठवड्यातून दोनदा केसांना कोमट खोबरेल तेलाने मसाज करा. केस गळणे थांबते व मुळे मजबूत होतात.

* चेहऱ्यावर कच्चे दूध लावून १० मिनिटांनी धुवा. टॅनिंग जाते व त्वचा नितळ होते.

## सल्ला

आल्याचा तुकडा प्लास्टिक पिशवीत न ठेवता पेपरमध्ये गुंडाळून फ्रीजमध्ये ठेवा. १५-२० दिवस ताजे राहते व बुरशी येत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २५ जून २०२६

**निर्जला एकादशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, स्वाती १६।२९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** प्रवासाचे योग प्रबळ. नव्या व्यक्तीशी ओळख होईल. उधार दिलेले पैसे परत येतील.

**वृषभ :** कलेत रस वाढेल. घर सजावटीवर खर्च होईल. तब्येत बरी राहील.

**मिथुन :** कोर्ट-कचेरीच्या कामात यश. स्पर्धा परीक्षेत चांगली बातमी. वाहन खरेदीचा योग.

**कर्क :** आईकडून आर्थिक मदत मिळेल. दूध, पाणी संबंधित व्यवसाय तेजीत. जुना वाद मिटेल.

**सिंह :** सरकारी कामे मार्गी लागतील. वडिलांचे सहकार्य मिळेल. मान-सन्मानात वाढ.

**कन्या :** भावंडांसोबत संबंध सुधारतील. छोटे प्रवास लाभदायक ठरतील. लेखन-प्रकाशनात यश.

**तूळ :** बोलण्यात गोडवा वाढेल. कुटुंबात नवीन सदस्याचे आगमन. बचत वाढेल.

**वृश्चिक :** स्वभावात बदल जाणवेल. नवीन लूक, नवीन कपडे यावर भर द्याल.


**धनु :** खर्चावर लक्ष ठेवा. बाहेरच्या राज्याशी संपर्क वाढेल. रुग्णालयाशी संबंधित काम निघेल.

**मकर :** मोठ्या भावाकडून लाभ. मित्रांकडून चांगली संधी मिळेल. इच्छा पूर्ण होईल.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी बदलाचे संकेत. नवीन जबाबदारी येईल. आई-वडिलांचा आशीर्वाद मिळेल.

**मीन :** दूरच्या प्रवासाचे योग. शिक्षणासाठी बाहेरगावी जाण्याची संधी. भाग्याची साथ मिळेल.

## शब्दगंध क्र. ७४५९ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अंदाज; तर्क; अटकळ २) कसाई; खाटीक ५) लढाऊ जहाजांचा ताफा; नौदल ६) एक शास्त्र; केमिस्ट्री १०) कांचन; सुवर्ण; सोने ११) दृष्टी १३) तालुक्याचे वसुलाचे काम; महत्त्व १५) निरनिराळे शोध लावणारे शास्त्र १७) गव्हाचे कणीदार पीठ १९) दिवा लावण्यासाठी बनविलेली कापसाची सुरळी २०) मोठा; शक्तिमान; जास्त २१) काळ्या तोंडाचा शेपटी असलेला एक प्राणी जो झाडावर वगैरे उड्या मारतो २२) नूतन; नवीन

**उभे शब्द :-** १) ज्याला मृत्यू नाही असा २) कोरा ; न लिहिलेला (कागद वगैरे) ३) कोणत्याही वस्तू ४) यशस्विता; भरभराट ७) छोटा; लहान ८) मालक; पती; यज्ञकर्ता ९) मऊ; मृदू; मवाळ १२) आठवड्यातील सुट्टीचा दिवस १४) मागे असलेले मोठे खटले १६) माहीत असलेले १७) दात; सुळे १८) जे आहे ते; सत्यस्थिती; हकीकत २०) माणसे; लोक

**शब्दगंध क्र. ७४५८ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** फुलांचा सुगंध वाऱ्याच्या दिशेनेच जातो, पण माणसाच्या स्वभावाचा सुगंध सर्व दिशांना दरवळतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पावसाळ्यात वीज का चमकते? विजेचा शोध कसा लागला?

आजच्या युगात वीज म्हणजे बटन दाबले की लाईट लागते, एवढाच समज झाला आहे. पण हजारो वर्षांपासून माणूस एकाच गोष्टीला घाबरत होता ती म्हणजे आकाशातली वीज. शेती करताना, रानात फिरताना कडाडणारी वीज पाहून माणूस हादरायचा. मग प्रश्न पडला, ही वीज येते कुठून? उत्तर शोधायला सुरुवात झाली ती विज्ञान जिज्ञासेतून. वीज म्हणजे कोणत्याही वायरशिवाय आकाशात तयार होणारी प्रचंड ऊर्जा. हा चमत्कार नाही, ही निसर्गाची पद्धत आहे जी चार्ज, ढग आणि हवा एकत्र शिकवते.जगात दोन प्रकारचे चार्ज असतात. एक पॉझिटिव्ह आणि एक निगेटिव्ह. ढग पहिल्या प्रकारात बसतो तर जमीन दुसऱ्या प्रकारात. इथे वायर जोडायची नसते तर चार्जला प्रवास करायचा असतो. हाच सगळ्यात मोठा फरक आहे.

पावसाळ्यात ढग एकमेकांवर घासतात आणि त्यात निगेटिव्ह चार्ज तयार होतो. जमिनीवर पॉझिटिव्ह चार्ज जमा होतो. चार्जला जेव्हा अंतर सहन होत नाही तेव्हा तो ढगातून जमिनीकडे झेपावतो. म्हणूनच वीज चमकताना आकाश तुम्हाला आरपार चिरताना दिसते आणि तुम्ही थरथरता. म्हणूनच वीज पाहणारा माणूस फक्त घाबरत नाही तर विचारही करतो.

या प्रश्नाची सुरुवात शाळेतल्या भूगोलाच्या तासापासून होते. शिक्षक सांगायचे, ढगात पाणी असते. तेच खरे विज्ञान होते. पुढे आपण त्याला विसरतो आणि मोबाईलच्या फ्लॅशलाइटकडे बघतो. पण सत्य हे आहे की एका विजेच्या कडकडाटात १०० कोटी व्होल्ट ऊर्जा असते. ती एका शहराला महिनाभर पुरेल एवढी आहे. कारण निसर्ग तुम्हाला फुकट देतो, बील मागत नाही. वीज फक्त प्रकाश देत नाही. विजेचे सौंदर्य त्याच्या ताकदीत आहे. बेंजामिन फ्रँकलिनने पतंग उडवला, मोकळ्या आकाशात जा. पतंगाच्या दोरीला किल्ली बांधा. वाय-फाय नाही, लॅब नाही, तरी त्याने वीज पकडली. हळूहळू तुमच्या लक्षात येते की तुमच्या घरातली वीज आणि आकाशातली वीज एकच आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुमची भीती गेली कारण आता तुम्ही कारण जाणताय. पुढची पायरी म्हणजे उपयोग. इथेच विज्ञान जादूला मागे टाकते. जादूत आज कबूतर उद्या ससा. हातचलाखी बदलते, डोळे तेच. पण इथे आज बल्ब, उद्या पंखा, परवा कॉम्प्युटर. रोज नवीन शोध आहे. जेव्हा पहिल्यांदा एडिसनचा बल्ब १३ तास जळला तेव्हा लहान मुलासारखा आनंद झाला होता. जेव्हा विजेवर रेल्वे धावली तेव्हा बैलगाडीला हरवल्याचा फील आला.

अनेकांना वाटते की याने फक्त लाईट लागते. हे अर्धसत्य आहे. ज्याने विजेचा अभ्यास केला त्याने टीव्ही, फ्रिज, मोबाईल बनवला. फरक एवढाच की इथे वीज सोयीसाठी वापरली जाते, भीतीसाठी नाही. वीज बेसिक आहे कारण रॉकेटमध्ये स्विच नसतो. तिथे लागतो चार्ज, कंडक्टर आणि फ्युज. हे तिन्ही वीज देते. हा प्रवास सोपा नाही. सुरुवातीला एक बल्ब लावायलाही शॉक लागू शकतो. हात थरथरतील, मन म्हणेल जाऊ दे मेणबत्ती लावू. पण जो शिकला तो उजळला. कारण एकदा विजेशी मैत्री झाली की आयुष्यभराचा प्रकाश मिळतो. वयाच्या नव्वदीतही टेस्ला विजेचे नवे प्रयोग करत होता. शेवटी वीज म्हणजे वरदान आहे. खांबाचे बंधन नाही, माणसाची वाट नाही. वादळ आले तरी घरात उजेड करता येतो. गावी गेला तरी शेतात मोटर चालते. हे निसर्गाला जनरेटर मानून त्याचीच ऊर्जा वापरण्यासारखे आहे. म्हणूनच म्हणतात, पेटवली की वात उजळते पण विज्ञान समजले की जग उजळते.

### खरे श्रीमंत

एका गावात रोहन आणि विकास नावाचे दोन शेजारी रहात होते. दोघांनाही श्रीमंत व्हायचे होते पण त्यांनी वेगळे मार्ग निवडले. रोहनने शहरात जाऊन मोठ्या कंपनीत नोकरी धरली. त्याने महागडा फ्लॅट, गाडी आणि ब्रँडेड कपडे घेतले. विकास मात्र गावातच राहिला. त्याने वडिलांची शेती सांभाळली आणि संध्याकाळी मुलांना फुकट शिकवायला सुरुवात केली. रोहन रोज बँक बॅलन्स वाढवायचा, सोशल मीडियावर फोटो टाकून स्वतःवर खुश व्हायचा कारण त्याची लाईफस्टाईल दिवसेंदिवस झगमगत होती. विकासकडे मात्र पैसाच नव्हता. तो रोज शेतात राबायचा, रात्री कंदिलात अभ्यास घ्यायचा. सुरुवातीला त्याला एकही रुपया शिल्लक टाकता येत नव्हता तरी त्याने शिकवणे सोडले नाही.

पाच वर्षांत रोहनची सेव्हिंग मोठी झाली, सूट बुट वाढले. विकासाचे घर तसेच मातीचे राहिले पण त्याचे अंगण मुलांनी भरलेले असायचे. खांदे वाकले पण चेहऱ्यावर वेगळेच समाधान होते. मग एक दिवस गावात मोठा दुष्काळ पडला. रोहनचा पगार बंद झाला, ईएमआय थकले आणि त्याची झगमग पूर्ण थांबली. विकासचे शेतही करपले पण त्याने शिकवलेल्या मुलांनी वर्गणी करून धान्य पाठवले. त्याच वेळी गावातली एक विधवा आजी आजारी पडली. रोहन हताशपणे म्हणाला की माझ्याकडे लाखो आहेत पण इथे एटीएम नाही. विकास मात्र क्षणाचाही विचार न करता धावला. त्याने बैलगाडीतून दवाखाना गाठला, शिकवलेल्या डॉक्टर मुलाला फोन केला आणि आजीला सुखरूप घरी आणले. सगळे गावकरी टाळ्या वाजवू लागले.

रोहनची मान शरमेने खाली गेली. दुष्काळ ओसरल्यावर तो विकासकडे गेला आणि म्हणाला की तूच खरा श्रीमंत आहेस मित्रा. विकास फक्त हसला आणि म्हणाला पैसा वाईट नाही, पण माणसं फक्त बँकेत कमावू नकोस. कारण संकटाच्या दिवशी चेकबुक कामाला येत नाही, तेव्हा कामाला येतात ती जोडलेली माणसे. हे ऐकून रोहनने ठरवले की आता तो पगारातला १०% हिस्सा गावासाठी देईल आणि महिन्यातून दोन दिवस विकाससोबत मुलांना शिकवेल. कारण त्याला कळले होते की दाखवण्यासाठी कमावलेली श्रीमंती एक वेळ संपते, पण वाटण्यासाठी कमावलेली पुण्याई आयुष्यभर साथ देते. फक्त खिशात जास्त दिसणाऱ्या नोटा महत्वाच्या नाहीत. खरी श्रीमंती तीच जी संकटाच्या वेळी स्वतःला आणि दुसऱ्याला जगवू शकते.

तात्पर्य : माणूस जोडणारा श्रीमंत होतो, फक्त पैसा जोडणारा एकटा पडतो.

## आत्मशक्ति



### बलिदान

परंतु सत्य तर नेहमी प्रेम आणि परस्परांत सुसंगतपणा इच्छिते. आपण दुसऱ्याला मदत कशी करू शकू असाच त्याचा विचार असतो. उलट मन आणि अहंकार मात्र आपल्या स्वतःसाठी काय हवे आहे ह्याचाच विचार करून त्यासाठी

काहीही करण्यास तयार असते. ते काया, वाचा, मने आम्हाला हिंसा शिकविते. कामवासना, क्रोध, मोह आणि स्वार्थाकडे घेऊन जाते. उलट जागृत आत्मा मात्र आम्हाला अहिंसा, नम्रपणा, निष्काम सेवा आणि पावित्र्याच्या मार्गावर नेतो व त्यासाठी आपले बलिदानही देतो.

रोज जर आमचे ध्यान नीट लागले तर जीवनाबाबतच्या प्रश्नांची आम्हाला

उत्तरे मिळतात. आम्ही स्वतःला विचारू शकतो की, हा आवाज मनाचा, अहंकाराचा आहे किंवा आत्म्याचा आहे? जर आम्हांला वाटले की आवाज मनाचा आहे तर आम्ही अधिक खोलवर विचार केला पाहिजे!

कुठपर्यंत? जोपर्यंत आम्हाला प्रेम आणि सत्य असे उत्तर मिळत नाही तोपर्यंत!

नियमितपणे ध्यान-

अभ्यास करीत राहिलो की आम्हाला आत्म्याचा शांत हळूवार आवाज ऐकू यावयास लागेल. त्या मार्गदर्शनाने आम्हाला शक्ती आणि विवेक प्राप्त होईल. त्यामुळे आमच्या रोजच्या जीवनात आमची पावले अगदी योग्य मार्गांनी पडावयास लागतील.

आत्मा अमर आहे, तो मृत्यु पावत नाही. आत्मा अमर आहे हे न समजल्याने बरेचसे लोक मृत्युला घाबरतात. आत्म्याशी जोडले गेल्यानंतरच मृत्युनंतर काय होते, हे आम्हाला समजते.

आत्मा अमर आहे, असेच जगातील सर्व धर्म समजतात. मृत्युनंतर आत्म्याच्या होणाऱ्या प्रवासाचे वर्णन सर्व धर्मग्रंथात वेगवेगळ्या पद्धतीने केले गेले आहे. आत्मा अमर आहे. हे मात्र प्रत्येकाने गृहीत धरले आहे.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### चिरंतन प्रेम

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र इतरांच्या चुकीच्या वागण्याची आपण नक्कल करत असू तर आपण आपल्या चांगल्या गुणांना अडथळा आणतो. त्यांच्याशी संवाद साधत आपण आपल्या गुणांना प्रसारित करायला हवं. प्रत्येक आत्मा एका मोठ्या प्रवासातून आला आहे. प्रत्येक जन्मात तो वेगवेगळे संस्कार निर्माण करतो.

दोन आत्म्यांचे संस्कार एकसारखे नसतात. लोकांकडेही आपल्यासारखे गुण असायला हवेत अशी अपेक्षा करू नका. आपण जेव्हा कोणासाठी काही करतो तेव्हा ते आपण त्यांच्यासाठी करत आहोत असा विचार करू नका. आपल्या मनात जर अनिच्छेचे नकारात्मक भाव असतील तर ते आणि आपण, दोघंही आनंदी होणार नाही. हे आपण यासाठी करत आहोत कारण हे नातं आणि त्यांचा आनंद आपल्यासाठी महत्त्वाचा आहे.

कधीकधी लोक आपल्याला हवं तसं वागतीलच असं नाही. अशा वेळी आपल्या मनाला सजगतेने त्यांच्या पूर्वीच्या चांगल्या वागण्याकडे नेलं पाहिजे, त्यांचं चांगलं वागणं आठवलं पाहिजे. असं केल्याने आपण त्या व्यक्तीकडे सकारात्मकतेने बघू शकतो आणि मग चालू परिस्थितीत योग्य प्रकारे प्रतिसाद देऊ शकतो.

सुरेश ओबेरॉय : माझ्या गुरूंनी मला एकदा सांगितलं होतं, तुमचा अनुभव हीच तुमची संपत्ती आणि प्रगती आहे. इतर गोष्टीविषयी सांगू नका. त्या तुमच्या नाहीत. शिवानीदीदी: अगदी योग्य तेच सांगितलंय.

सुरेश ओबेरॉय : एका कार्यक्रमात मी एका प्रसिद्ध व्यक्तीला भेटण्यासाठी उत्सुक होतो. त्यांची खुर्ची माझ्या बाजूला होती. जेव्हा ते आले तेव्हा मी त्यांना अभिवादन केलं पण त्यांनी माझ्याकडे

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको :** अहो, तुम्ही माझ्यासाठी चंद्र-तारे पण आणाल का?
**नवरा :** आणीन गं... पण आधी तू स्वयंपाक करताना जळालेल्या पोळ्यांचा 'ब्लॅक होल' बनवायचं बंद कर.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* २०२६ मध्ये भारताने आयोजित केलेल्या जी२० शिखर परिषदेचे मुख्य घोषवाक्य काय होते? - 'वसुधैव कुटुंबकम्'

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### पावटा

उपयोग : १) जर आम्लपित्ताचा त्रास होऊन पोटामध्ये जळजळ व वेदना जाणवत असतील, तर त्या थांबविण्यासाठी पावट्याच्या शेंगांचा काढा करून प्यायला द्यावा.

२) काही स्त्रियांना मासिक पाळीच्या वेळी अति प्रमाणात रक्तस्राव होतो व त्या रक्तास्रावामुळे पोटात वेदनाही होतात. अशा वेळी पावटा गुणकारी ठरतो. पावट्याचा रस अर्धा कप सकाळी व संध्याकाळी प्यायला दिल्याने त्याच्या स्तंभक व वेदनाशामक गुणांमुळे मासिक रक्तस्राव कमी होऊन पोटातील वेदना थांबतात.

३) जर तापाचा वेग जास्त प्रमाणात वाढला असेल, तर शरीराचा ताप कमी करण्यासाठी पावट्याचा रस प्यायला द्यावा.

भूक कमी लागणे, अपचन, आम्लपित्त या विकारांवर पावटा गुणकारी ठरतो. पावटा खाल्ल्याने शरीरातील आमाशयाला (जठराला) बल मिळते व त्यातून वरील आजार कमी होतात.

शरीरावर बऱ्याच दिवसांची जुनी जखम झालेली असेल, तर ती जखम भरून येण्यासाठी व तेथील वेदना कमी करण्यासाठी पावट्याच्या शेंगांची भाजी करून नियमित खावी व पावट्याचा कल्क जखमेवर लावावा. कान ठणकत असेल, तर अशा वेळी पावट्याचा गाळलेला रस कानात दोन थेंब टाकावा. यामुळे ठणका लगेचच कमी होतो.

७) स्त्रियांच्या अंगावरून पांढरे पाणी जात असेल (श्वेतस्राव), तर ते कमी करण्यासाठी पावट्याचा काढा करून अर्धा कप दोन वेळा घ्यावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००



'राजमाता गोमाता संवाद यात्रा'चे अहिल्यानगरमध्ये उत्साहात स्वागत करण्यात आले.

# 'सेव्ह काऊ, सेव्ह ट्री' ही लोकचळवळ व्हावी

### गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांचे प्रतिपादन; 'राजमाता गोमाता संवाद यात्रे'चे अहिल्यानगरमध्ये स्वागत; गोशाळा संचालक व पशुपालकांचा प्रतिसाद

नगर – जळणासाठी लाकूड वापरण्याचा प्रघात बदलून त्याऐवजी गोशाळेत गाईच्या शेणापासून तयार करण्यात येणाऱ्या 'गोकाष्ठ'चा वापर करणे आवश्यक आहे. गोकाष्ठ वापराला प्राधान्य दिल्यास गोशाळा आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील. त्यासाठी 'सेव्ह काऊ, सेव्ह ट्री' हा पर्यावरणपूरक उपक्रम लोकचळवळीत रूपांतरित करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेखर मुंदडा यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धन विभाग आणि महाराष्ट्र गोसेवा आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राजमाता गोमाता संवाद यात्रा' २२ जून रोजी पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयातून सुरू झाली. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी तिचे अहिल्यानगरमध्ये आगमन झाले. यानिमित्त मनमाड रोडवरील हॉटेल संजोग येथे संवाद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव, गोसेवा आयोगाचे सदस्य डॉ. सुनील सूर्यवंशी व उद्धव नेरकर, पशुसंवर्धन विभागाचे उपआयुक्त डॉ. उमेश पाटील, गजेंद्र सोनवणे, संजय अडोळे, सचिन जगताप, गोसेवा महासंघाचे अध्यक्ष ललित चोरडिया, सुरेंद्र गांधी, हभप. रवींद्र सुदरीक महाराज, राजेंद्र पाचे, पांडुरंग दातीर उपस्थित होते.

अहिल्यानगरमध्ये डी–मार्ट चौक ते हॉटेल संजोग दरम्यान 'गोरथाची' उत्साही शोभायात्रा काढण्यात आली. श्री रुक्मिणी माता गोशाळा, राशीन आणि श्री दत्त योगीराज आश्रम येथील वारकरी संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या टाळ–मृदुंगाच्या गजरात ही शोभायात्रा पार पडली. त्यानंतर गोमाता पूजन, गोपालकृष्ण पूजन, दीपप्रज्वलन आणि गोमाता आरती करून संवाद सत्रास प्रारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे गाईंपासून मिळणाऱ्या विविध उत्पादनांचे आणि गोमय–गोमूत्रापासून तयार करण्यात आलेल्या वस्तूंचे प्रदर्शन. तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कारही गोमयापासून बनविलेल्या वस्तू भेट देऊन करण्यात आला. गोसेवा आयोगाच्या वतीने शेखर मुंदडा यांच्या हस्ते गोमयापासून तयार केलेली घड्याळे भेट देण्यात आली.

यावेळी अनेक गोपालक व गोशाळा संचालकांनी आपल्या विविध मागण्या व समस्या मांडल्या. या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन शेखर मुंदडा आणि पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. उमेश पाटील, डॉ. मुकुंद राजळे आणि डॉ. संतोष पालवे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश पारखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोशाळा महासंघाचे सचिव गौतम कराळे यांनी केले. राष्ट्रगीत आणि 'गोमाता की जय'च्या घोषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## मन व्हावे उन्मन

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स



मनाचा हा छंदच, वाटेल तिकडे भरकटणे! मनाला ही सवयच, स्वतःला खूप समजणे! मनाचा हा उद्योगच, दुसऱ्यांच्या घरात डोकावणे, दुसऱ्याला तुच्छ लेखणे! मनाचा हा धर्मच, फक्त स्वार्थ साधणे! म्हणून म्हटलंय 'संयम राखा, अन्यथा प्रसंग ओढवेल बाका! मग गाढवाला म्हणावं लागेल काका!'

कामाचं महत्त्व वाटलं पाहिजे. काम व्हावं हा भाव मनी दाटलाच पाहिजे. जीव लावून ते काम केलं पाहिजे. असं कामच अगत्यकृतीत जाणवलं की, मनाला खोडी करायला वावच कुठं? आळस, टाळाटाळ करायला मनाकडं लक्षच कुठं?'

मनाला मार्गी लावल्याशिवाय कुठलंही काम साधन नाही. म्हणून मनाला वळण लावा. काम साधल्याचं समाधान मिळवा. एकादा मनाचे वाईट धर्म घालवले की, वैकुंठ प्राप्त झाले. वैकुंठ म्हणजे अशी अवस्था की, जिथं सगळे खंडित होण्याचे मार्ग खुंटलेत. हवं ते मिळेल. सद्भावना, सदिच्छा व सत्कर्म साधून सर्व प्रकारचं मानसिक समाधान लाभणं, हीच वैकुंठप्राप्ती होय. मुक्ताबाईदेखील हेच सांगतात,

एकदा एक राजा आपल्या लवाजम्यासह जंगलात गेला. दाट जंगल. रखरखीत ऊन! तहानेनं मग मन व्याकुळलं. राजा म्हणाला, 'जवळपास पाणी शोधा.' प्रधानानं नोकराला सांगितलं, 'पाणी शोधा'

नोकर वणवण फिरला. पाण्याचा पत्ताच नाही लागला. तेवढ्यात एका झाडाखाली एक साधू बसलेला दिसला. त्याला पाण्याचा पत्ता असेल, राजाची तहान घालवायला पाणी देऊ शकेल. तो साधूकडे गेला. साधू आंधळा निघाला. नोकरानं त्याला तुच्छ लेखलं. तो म्हणाला, 'ए आंधळ्या, पाणी हवं. तुझ्याजवळ असेल तर दे तहान लागलीय. ' साधू म्हणाला, 'तहान पाण्याची दिसत नाही ? जा निघ. पाणी मिळायचं नाही. '

नोकर परतला. आणि प्रधान गेला. आंधळ्या साधूला म्हणाला, 'अरे! तहानलेल्याची तहान भागवावी ही साधी भूतदयादेखील तू जाणत नाहीस? असा काय साधू ?'

साधू म्हणाला, 'शिकवू नकोस मला. तुझा संधिसाधुपणा कळतो मला. जा, पाणी मिळायचं नाही. '

प्रधानही परतला. मग राजा स्वतः गेला. तहानलेल्या अधीर मनाला राजानं आवरलं. आपण कुणी मोठे आहोत ही मानसिक अवस्था दूर ठेवली व नम्रपणे म्हणाला, 'मी तहानेनं व्याकुळलो आहे. आपण पाणी देऊ शकाल प्यायला? उपकृत होईन. '

साधूनं लगेच कमंडलू पुढं केला. पाणी दिलं व म्हणाला, 'राजा आहेस ना राजा दचकला. 'तुम्ही आंधळे असून मला कसं ओळखलंत ?'

साधूनं हसून म्हटलं, 'एवढी नम्रता आणि मनाला आवर घालण्याची क्षमता हीच राजाची खूण!' माणूस ओळखायला डोळे नकोत, अंतर्दृष्टी हवी. समोरच्याचं मन जाण्याची क्षमता हवी.

**– किशोर गांधी**

# घोंडेगाव येथे प्रस्तावित अपर तहसील कार्यालयाबाबत ८ जुलैपर्यंत 'लेखी हरकती अथवा सूचना' पाठवाव्यात

नगर – प्रशासकीय कामकाजात सुलभता आणणे, गतिमानता वाढविणे तसेच नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे नवीन अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. प्रस्तावित अपर तहसील कार्यालयाच्या निर्मितीबाबत तसेच क्षेत्र पुनर्रचनेबाबत तालुक्यातील स्थानिक नागरिक व संस्थांनी त्यांच्या लेखी हरकती अथवा सूचना ८ जुलै पर्यंत तहसील कार्यालय, नेवासा येथे सादर कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

प्रस्तावानुसार अपर तहसील कार्यालयाचे मुख्यालय घोडेगाव येथे राहणार असून त्यामध्ये चांदा, सोनई, घोडेगाव, वडाळा बहिरोबा आणि देडगाव या महसूल मंडळांचा समावेश करण्यात येणार आहे. या मंडळांतील सर्व गावे प्रस्तावित अपर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होणार आहेत.

या प्रस्तावाबाबत संबंधित क्षेत्रातील नागरिक, संस्था तसेच इतर संबंधित घटकांना काही हरकती अथवा सूचना असल्यास त्या विहित अटी व शर्तींच्या अधीन राहून सादर करता येणार आहेत. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून अंतिम निर्णय घेण्यात येईल. नागरिकांनी त्यांच्या हरकती व सूचना स्पष्ट कारणांसह तसेच आवश्यक पुराव्यांसह (नकाशे अथवा सांख्यिकीय माहिती असल्यास) विहित मुदतीत सादर कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.

प्राप्त सर्व हरकती व सूचनांचे दैनंदिन संकलन करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचेही उपविभागीय अधिकारी श्री. पाटील यांनी सांगितले.

# पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवा'चा २७ जून रोजी पारितोषिक वितरण

### राज्यस्तरीय वक्तृत्व, चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा होणार गौरव

नगर – पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त विचार भारती संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवांतर्गत विविध राज्यस्तरीय स्पर्धांना प्रतिसाद लाभला. या महोत्सवामध्ये राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यशस्वीरीत्या झाल्या असून या स्पर्धांतील विजेत्या स्पर्धकांचा गौरव व पारितोषिक वितरण सोहळा २७ जून रोजी सायंकाळी ४ वाजता न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमासाठी शिवचरित्रकार डॉ. अशोक बांगर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, न्यू आर्ट्स, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य प्रा. डॉ. बाळासाहेब सागडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि स्पर्धक उपस्थित राहणार असल्याची माहिती स्पर्धाप्रमुख चंद्रकांत तागड यांनी दिली.

यावेळी बोलताना चंद्रकांत तागड म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक महोत्सवाला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला. विविध स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि युवकांना अहिल्याबाई होळकर यांचे जीवनचरित्र, त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, लोककल्याणकारी प्रशासन, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा समजून घेण्याची संधी मिळाली. ते पुढे म्हणाले की, अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळते, तसेच इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे कार्य नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचते.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे जीवन हे आदर्श नेतृत्व, लोकसेवा आणि संस्कारांचे प्रेरणादायी उदाहरण असून त्यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे.

विचार भारती संस्थेच्यावतीने सर्व स्पर्धक, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या पारितोषिक वितरण सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शिक्षण अशी संपत्ती आहे जी कोणीही हिरावून घेऊ शकत नाही

### डॉ. विवेकानंद कंगे यांचे प्रतिपादन; मखदुम व रहमत सुलतानतर्फे जि.प. प्राथमिक शाळा वैदवाडी येथे वह्यांचे वाटप



मखदुम व रहमत सुलतानतर्फे जि.प. प्राथमिक शाळा वैदवाडी येथे वह्यांचे वाटप करण्यात आले.

नगर – वहया केवळ कागदांची पाने नाहीत तर त्या तुमच्या उज्वल भवितव्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहेत. शिक्षण ही अशी संपत्ती आहे जी कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तुमच्या हातातील प्रत्येक वही ज्ञानाचा खजिना आहे. या वहीत लिहिलेला प्रत्येक शब्द, प्रत्येक धडा आणि प्रत्येक सराव तुमचे भविष्य घडवणार आहे. मोठे स्वप्न पाहा, मेहनत करा आणि आपल्या आई–वडिलांचे, शिक्षकांचे तसेच समाजाचे नाव उज्वल करा.उद्या तुम्ही यशस्वी झाल्यावर अशाच प्रकारे गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याची प्रेरणा घ्या. कारण समाजाच्या प्रगतीचा मार्ग शिक्षणातूनच जातो, असे प्रतिपादन गायक डॉ.विवेकानंद कंगे यांनी केले.

मखदुम एज्युकेशन अॅण्ड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशनच्या वतीने व विकास कांबळे, संजय भिंगारदिवे, डॉ.शैलेंद्र खंडागळे, सुनील वाघमारे, प्रा. डॉ.महेबुब सय्यद, अमीन धाराणी, आदित्य वडवणीकर, डॉ. अश्फाक पटेल, विजय पिंपरकर आदी दानशूरांच्या सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वैदवाडी येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी डॉ. विवेकानंद कंगे, डॉ. शैलेंद्र खंडागळे, मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुलेखान, मुख्याध्यापक संभाजी जाधव, सौ. मिनाक्षी जाधव, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. कामिनी कुमार लोखंडे, अंगणवाडी सेविका मंदा पंडित, कल्पना कांबळे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक करताना सौ. मिनाक्षी जाधव यांनी मखदुम सोसायटीच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा गौरव केला. त्या म्हणाल्या की, सोसायटीतर्फे विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयासाठी आवश्यक असलेल्या वह्यांचे वाटप करण्यात आले असून दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक आर्थिक परिस्थितीचा विचार करून स्पोर्ट्स ड्रेस, पाट्या, चाररेघी, दुरेघी, चौकट वह्या, पेन्सिल बॉक्स आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला असून पालकांनीही संस्थेच्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे कौतुक केले.

सूत्रसंचालन मुख्याध्यापक संभाजी जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. शैलेंद्र खंडागळे यांनी केले.

# आरोही संगीत विद्यालयाचे संगीत परीक्षेत यश

### संस्कार जाधवला तबला विशारद पदवी

नगर – अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल – मे २०२६ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत परीक्षा तबला व गायन या विषयात आरोही संगीत विद्यालयाचे विद्यार्थी विविध परीक्षामध्ये प्रथम श्रेणीसह विशेष योग्यतेमध्ये उत्तीर्ण झाले आणि १००% निकालाची परंपरा कायम ठेवली.

विद्यालयातील पहिला विद्यार्थी चि. संस्कार जाधव याने तबला विशारद ही पदवी प्रथम श्रेणी मध्ये विशेष प्राविण्यासह संपादित केली तर चि. तुषार कोर्हाळे हा विद्यार्थी विशारद प्रथम परीक्षेत केंद्रात प्रथम आला आहे.

परीक्षा निहाय निकाल खालील प्रमाणे –

संगीत संस्कार (तबला) – सारंग रिसे(केंद्रात पहिला), पार्थ ठिपसे, श्रियांश साळोखे, शिवतेज दळवी, स्वराज मेटे, सोहम भोर (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

प्रारंभिक (तबला) – कृष्णा ढवळे(केंद्रात पहिला), रुद्र तुपे, प्रसाद पाटील, कृष्णा मरकड (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

प्रारंभिक (गायन) – संस्कृती जाधव, समर्थ वयभासे, सानिल हजारे, आराध्या रिसे (सर्व प्रथम श्रेणी)

प्रवेशिका प्रथम (तबला) – वैष्णवी वारे (केंद्रात पहिली), स्वरा नन्नवरे (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

प्रवेशिका प्रथम(गायन) – स्वरा कुलकर्णी (प्रथम श्रेणी)

प्रवेशिका पूर्ण (तबला) – शौर्य देशमुख( विशेष योग्यतेसह केंद्रात प्रथम), सर्वेश इथापे, वैभव बागडे, कृष्णा कापरे, रुद्र कामठे (सर्व प्रथम श्रेणी व विशेष योग्यता)

मध्यमा प्रथम (तबला) – आदित्य साळवे (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)

मध्यमा पूर्ण (तबला) – जयराम नवले (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)

विशारद प्रथम (तबला) – तुषार कोर्हाळे (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)

विशारद पूर्ण तबला – संस्कार जाधव (प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम)

विद्यार्थ्यांना विद्यालयाचे संचालक स्वप्निल खराडे, खोपटीकर सर व सौ. शितल खराडे यांचे मार्गदर्शन लाभले असून आपल्या पाल्यावर सांगीतिक सुसंस्कार घडविण्यासाठी +९१ ९५२७८ ९५२५८ या नंबर वर संपर्क करावा असे आवाहन स्वप्नील खराडे यांनी केले आहे.




डॉ.विखे पाटील कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यानी देहरे गावचे ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण रांगोळीच्या माध्यमातून उत्कृष्टपणे साकारले होते. (छाया–विजय मते)

# कृषी कन्यांकडून देहरे येथे ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण

नगर – देहरे येथे विळदघाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण मुल्यमापन सर्वेक्षणाचे उत्कृष्ट आयोजन केले. या उपक्रमात ढेरे गायत्री, गांगर्डे श्रेया, गोंडाळ श्रेया, कर्डिले स्नेहल, खटाने समीक्षा, नेहुल वैष्णवी, निकम स्नेहल या विद्यार्थीनीने गावक–यांच्या सहभागातून विविध मूल्याकनांत आराखडे तयार केले, शेतकर्यांच्या सक्रिय सहभागातून सामाजिक नकाशा, दळणवळण नकाशा, प्रमुख पिकांच्या आराखडा तयार करण्यात आले.

या माध्यमातून विद्यार्थीनीने गावातील विविध समस्या, शेतीविषयक अडचणी जाणून घेतल्या, तसेच गावकऱ्यांशी चर्चा करून त्यांच्या सूचना व अभिप्राय संकलित करण्यात आले. विद्यार्थीनींनी गावाची शेताची परिस्थिती, तसेच शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला. सामाजिक संस्थांचे दर्शन घडवण्यासाठी रंगीत रांगोळीच्या माध्यमातून संशोधन नकाशा तयार करण्यात आला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत, कार्यक्रम समन्वयक प्रा.किरण दांगडे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ.दिपिका मावळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी गावातील शेतकरी उपस्थित होते. कृषिकन्यांकडून देहरे गावचे ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण करून रांगोळीच्या माध्यमातून साकारल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले कृषी महाविद्यालयाकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल सरपंच ग्रामसेवक आदींनी त्यांचे आभार मानले.

# श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिर जीर्णोद्धारासाठी ५१ हजारांची देणगी



श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिर जीर्णोद्धारासाठी कमलाक्षी शंकर येमुल यांनी ५१ हजारांची देणगी दिली.

नगर – अहिल्यानगरीतील पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत व कुलदैवत असलेल्या श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिराला यावर्षी गौरवशाली १०२ वर्षे पूर्ण होत आहेत. समाजाच्या श्रद्धेचे, संस्कृतीचे आणि एकतेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त जीर्णोद्धार व विस्तार प्रकल्प हाती घेण्यात आला असून त्याचे काम सध्या वेगाने प्रगतीपथावर आहे.

महर्षी मार्कंडेय महामुनी हे पद्मशाली समाजाचे कुलदैवत मानले जातात. समाजाच्या आध्यात्मिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे ते प्रेरणास्थान असून त्यांच्या आशीर्वादाने समाजाने अनेक पिढ्यांपासून आपली संस्कृती आणि परंपरा जपली आहे. त्यामुळे या ऐतिहासिक मंदिराचे संवर्धन व जतन करण्यासाठी समाजबांधवांनी एकत्र येत जीर्णोद्धाराच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धार प्रकल्पांतर्गत दोन महिन्यांपूर्वी पहिल्या स्लॅबचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. स्लॅब पूजन सोहळ्याच्या वेळी मंदिराचे अध्यक्ष श्रीकांत छिंदम यांनी मंदिराच्या पुढील बांधकामासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक व भाविकांनी उदार हस्ते आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला समाजातून प्रतिसाद मिळत असून अनेक दात्यांनी मंदिर विकासासाठी मदतीचा हात पुढे केला आहे. याच भावनेतून कमलाक्षी शंकर येमुल यांनी श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिराच्या जीर्णोद्धार निधीसाठी रु. ५१,००० इतकी देणगी देऊन समाजाप्रती असलेली आपली श्रद्धा आणि बांधिलकी व्यक्त केली. त्यांनी ही देणगी श्रीकांत छिंदम यांच्याकडे सुपूर्त केली. त्यांच्या या उदार योगदानाबद्दल मंदिर समितीच्या वतीने विशेष सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी शकुंतला गुंडू, अंबिका सामलेटी, रेणुका बत्तीन, सुनंदा कुरापाटी, लक्ष्मी नक्का, पोलिस अधिकारी राहुल गुंडू, विनायक गुडेवार, महेश सब्बन, पद्मशाली ज्ञाती समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम, दत्तात्रय कुरापट्टी, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे संचालक राजू म्याना, पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टचे खजिनदार दीपक गुंडू यांच्यासह पदाधिकारी व भाविक उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या या मंदिराच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त सुरू असलेला जीर्णोद्धार प्रकल्प हा केवळ बांधकामाचा उपक्रम नसून समाजाच्या एकतेचा, श्रद्धेचा आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनाचा संकल्प आहे. मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झाल्यानंतर भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होणार असून भावी पिढ्यांसाठी हा आध्यात्मिक वारसा अधिक भव्य आणि आकर्षक स्वरूपात जतन केला जाणार आहे.

मंदिराच्या उर्वरित बांधकाम साठी समाजातील दानशूर व्यक्तींनी सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



पल्स पोलिओ जनजागृती फलकाचे अनावरण करताना महापौर ज्योतीताई गाडे, दिपालीताई बारस्कर व इतर अधिकारी. (छाया – लहू दळवी)

# राष्ट्रीय पल्स पोलिओ डोस मोहीम २८ जूनला; अहिल्यानगर महानगरपालिकेची तयारी पूर्ण

## शहरातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही : महापौर ज्योतीताई गाडे

नगर – राष्ट्रीय पल्स पोलिओ निर्मूलन मोहिमेअंतर्गत २८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शून्य ते पाच वर्षे वयोगटातील सर्व बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असून या मोहिमेसाठी अहिल्यानगर महानगरपालिकेची सर्व तयारी पूर्ण झाली आहे. महापौर ज्योतीताई गाडे यांनी विशेष बैठक घेऊन मोहिमेच्या पूर्वतयारीचा आढावा घेत विविध सूचना दिल्या.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, शहरातील एकही बालक पल्स पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले आहे. शेवटच्या घटकातील बालकापर्यंत पोहोचण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून शहरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत ही मोहीम प्रभावीपणे पोहोचविण्यात येणार आहे. शहरामध्ये महापालिकेची सात आरोग्य केंद्रे तसेच २२५ पोलिओ बूथवर एकाच वेळी बालकांना पल्स पोलिओचा डोस देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या बैठकीस महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपायुक्त मेहेर लहारे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेवक करण कराळे, डॉ. वृषाली आरु, सुनील कटारिया, राजेश परदेशी, अमर गुरप, सतीश ठोंबे, आयेशा शेख, डॉ. गिरीश दळवी, योगेश औटी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे पुढे म्हणाल्या, शहरातील सर्व पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील पाल्यांना २८ जून रोजी जवळच्या पोलिओ केंद्रावर घेऊन जाऊन पल्स पोलिओचा डोस देणे आवश्यक आहे. पोलिओमुक्त भारताच्या राष्ट्रीय अभियानात प्रत्येक पालकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. सतीश राजुरकर म्हणाले, राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम ही बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मोहीम आहे. महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील सर्व पोलिओ बूथचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. आशा सेविका, आरोग्य सेविका आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमार्फत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली आहे. २७ जून रोजी विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सायकल व मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले असून त्याद्वारे पल्स पोलिओ मोहिमेबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. शहरातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहू नये यासाठी विशेष भर देण्यात येत असून सर्व पालकांनी आपल्या बालकाला पोलिओचा डोस देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. वृषाली आरु यांनी पल्स पोलिओ मोहिमेबाबत सविस्तर माहिती देताना मोहिमेचे स्वरूप, लाभार्थी बालकांची संख्या, पोलिओ बूथचे नियोजन, आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती, जनजागृती उपक्रम तसेच विशेष पथकांच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन केले.

रोटरी क्लबच्यावतीने तयार करण्यात आलेल्या पल्स पोलिओ जनजागृती फलकाचे अनावरण महापौर ज्योतीताई गाडे आणि महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर यांच्या हस्ते करण्यात आले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका प्रशासन, आरोग्य विभाग, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त सहभागातून शहरातील प्रत्येक बालकापर्यंत पोहोचण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# रामवाडीत असंघटित कामगारांची मोफत आरोग्य तपासणी



नगर – जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर, संपूर्ण सुरक्षा केंद्र अहिल्यानगर, सुरक्षा क्लिनिक तसेच आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्र रामवाडी–सर्जेपुरा यांच्या संयुक्त विद्यमाने रामवाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास परिसरातील नागरिकांचा प्रतिसाद लाभला. या शिबिरात असंघटित कामगारांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिराप्रसंगी शिबिरास श्रीमती रोहिणी बोरुडे (स्टाफ नर्स), डॉ. आकांक्षा हराळे, श्रीमती नीता उडानशिवे, विकास उडानशिवे, विनय इदे (समुपदेशक), सागर फुलारी (व्यवस्थापक, संपूर्ण सुरक्षा केंद्र), श्रीमती वैशाली कुलकर्णी, रोहन भांबळ, राहुल खैरनार उपस्थित होते.



शिबिरामध्ये थायरॉईड, उच्च रक्तदाब, मधुमेह, कावीळ, एचआयव्ही, गुप्तरोग, सिरम कॅल्शियम आदींच्या मोफत तपासण्या करण्यात आल्या. विविध रक्त तपासण्यांसाठी नावनोंदणीही करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी रामवाडी येथील आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्राच्या कार्याचे विशेष कौतुक केले. परिसरातील कष्टकरी, असंघटित कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हे केंद्र खऱ्या अर्थाने जीवनदान ठरत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. दैनंदिन मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांना मोफत व सहज उपलब्ध आरोग्यसेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या केंद्रामार्फत केले जात आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. आकांक्षा हराळे यांनी आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करताना आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या निरोगी असणे होय, असे सांगितले. त्यांनी संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

श्रीमती रोहिणी बोरुडे यांनी असंसर्गजन्य आजारांबाबत मार्गदर्शन करून नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी केली तसेच महिलांना आरोग्यविषयक सल्ला दिला. नीता उडानशिवे यांनी आरोग्य संवर्धन आणि रोगप्रतिबंधक उपाययोजनांविषयी माहिती दिली.

एचआयव्ही/एड्स जनजागृती विषयावर मार्गदर्शन करताना विनय इदे यांनी नियमित तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले. एचआयव्ही, गुप्तरोग, कावीळ यांसारख्या आजारांच्या तपासण्या वेळेवर करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच रोहन भांबळ, वैशाली कुलकर्णी आणि सागर फुलारी यांनी विविध आजारांबाबत माहिती देऊन समुपदेशन केले.

रक्तदाब , मधुमेह, लसीकरण, माता–बाल आरोग्य सेवा, आरोग्य समुपदेशन, असंसर्गजन्य आजारांचे निदान आणि जनजागृती यांसारख्या विविध सेवांमुळे नागरिकांना मोठा आधार मिळत आहे. वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांमुळे अनेक आजारांचे लवकर निदान होऊन उपचार शक्य होत आहेत.

विकास उडानशिवे म्हणाले की, रामवाडी येथील आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्र हे परिसरातील कष्टकरी व असंघटित कामगारांसाठी आशेचा किरण ठरले आहे. गरीब व सर्वसामान्य नागरिकांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे केंद्र करत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे काम या केंद्रामार्फत प्रभावीपणे सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी संपूर्ण सुरक्षा केंद्र, सुरक्षा क्लिनिक तसेच आयुष्यमान भारत आरोग्यवर्धिनी केंद्र रामवाडी–सर्जेपुरा येथील सर्व कर्मचारी व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘अमृत मानस मित्र’ प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअर घडविण्याची संधी

नगर – विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ‘अमृत’च्या वतीने ‘अमृत मानस मित्र’ समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक–युवतींसाठी हा उपक्रम संधी ठरणार असून पात्र उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://mahaamrut.org.in या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून प्रबोधन सत्र, आवश्यक परीक्षा अथवा मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. उमेदवारांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव विचारात घेऊन तसेच ‘प्रथम येणाऱ्यास प्राधान्य’ या तत्त्वानुसार अंतिम निवड करण्यात येईल. पहिल्या बॅचसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २९ जून आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्य करणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय श्रवण कौशल्ये, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मनोसामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम असून सहभागी उमेदवारांना प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक म्हणून विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत आणि महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

पुणे येथे १५ दिवसांचे निवासी स्वरूपातील ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये संवादात्मक सत्रे, प्रकरण अभ्यास, प्रात्यक्षिक उपक्रम आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर एक महिन्याचा क्षेत्रीय प्रशिक्षण व अनुभव कार्यक्रम राबविण्यात येणार असून सहभागी उमेदवारांना जिल्हास्तरावरील शाळा किंवा महाविद्यालयांशी जोडले जाईल. पुढील तीन ते पाच महिन्यांच्या कालावधीत तज्ज्ञांकडून सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पर्यवेक्षण, ऑनलाइन सत्रे आणि व्यावसायिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथील तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून देण्यात येणार असून अमृतमार्फत विविध तज्ज्ञांचे अनुभवाधारित मार्गदर्शन व सहकार्यही मिळणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतरही प्रकरण चर्चा, ऑनलाइन पर्यवेक्षण, मार्गदर्शन सत्रे, प्रत्यक्ष कामातील अडचणींचे निराकरण, व्यावसायिक सल्ला तसेच कौशल्यवृद्धीसाठी सातत्यपूर्ण सहकार्य उपलब्ध राहणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी आवश्यक व्यवस्था उभारण्यास प्राधान्य दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर ‘अमृत मानस मित्र’ उपक्रम राज्यात प्रशिक्षित विद्यार्थी समुपदेशक तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या प्रशिक्षणाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्य करण्याची संधी, रोजगारक्षम कौशल्यांचा विकास, सामाजिक संस्थांमधील रोजगाराच्या संधी तसेच व्यावसायिक नेटवर्किंगची संधी उपलब्ध होणार आहे. एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एस्सी. (समुपदेशन मानसशास्त्र) किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क (एमएसडब्ल्यू) पदवीधारक उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. संबंधित क्षेत्रात पूर्वानुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

‘अमृत मानस मित्र’ प्रशिक्षण हे अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी पूर्णपणे मोफत असले तरी प्रशिक्षणादरम्यान निवास व भोजनाचा खर्च उमेदवारांनी स्वतः वहन करावयाचा आहे.

महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथील डॉ. कापसे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या वाढत्या गरजा लक्षात घेता प्रशिक्षित विद्यार्थी समुपदेशकांची आवश्यकता आज पूर्वीपेक्षा अधिक आहे. ‘अमृत मानस मित्र’ प्रशिक्षण हा केवळ प्रमाणपत्र अभ्यासक्रम नसून प्रत्यक्ष कौशल्य विकास, क्षेत्रीय अनुभव, तज्ज्ञांचे पर्यवेक्षण आणि व्यावसायिक मार्गदर्शन यांचा समन्वय साधणारा अभिनव उपक्रम आहे. मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक–युवतींसाठी ही निश्चितच एक संधी आहे.

# अखिल भारतीय संवाद परिषदेच्या अध्यक्षपदी सीए प्रा. शंकर अंदानी

## ‘लोकराजा राजर्षी शाहू महाराज जयंती दिनी संवाद परिषद’



नगर – राजर्षी शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या ‘लोकराजा राजर्षी शाहू महाराज पहिले अखिल भारतीय संवाद परिषद’च्या अध्यक्षपदी साहित्य, समाजकारण आणि लेखा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे अहिल्यानगरचे सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांची निवड करण्यात आली आहे. २६ जून रोजी कोल्हापूर येथील दसरा चौकातील मोहामेडन एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात हा सोहळा पार पडणार आहे. गंगाधर कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात ‘लोकराजा राजर्षी शाहू पुरस्कार–२०२६’ वितरण समारंभाचेही आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला पद्मश्री उदय देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिषदेत राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा, शिक्षणविषयक धोरणे आणि समतावादी विचारसरणीवर विविध तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. परिषदेचे संयोजक कमलाकर वर्टेकर यांनी ही माहिती दिली.

सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात केलेल्या भरीव कार्यामुळे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. साहित्य क्षेत्रात त्यांनी अनेक अभूतपूर्व विक्रमांची नोंद केली असून एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तकांचे प्रकाशन करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर आहे.

याशिवाय ‘आई’ या विषयावर आधारित ५,१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानही त्यांनी मिळविला आहे. आजवर त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध ग्रंथांमधून प्रकाशन झाले असून या कार्याची स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे. मराठी साहित्याला नवे आयाम देत त्यांनी ‘वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे’ या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या १,१६१ कवितांचे संकलन करून भव्य काव्यसंग्रह प्रकाशित केला. तसेच ‘बहिण माझी प्रिय ताई’ या नावाने बहिणीवरील १,१६१ कवितांचे स्वतंत्र संकलन प्रकाशित करून कौटुंबिक नातेसंबंधांवरील साहित्याला नवी दिशा दिली आहे.

अंदानी यांच्या या विक्रमी साहित्यिक कार्याची दखल लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्ससारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी घेतली आहे. त्यांच्या नावावर विविध जागतिक विक्रमांची नोंद करण्यात आली असून साहित्य क्षेत्रातील त्यांच्या योगदानाचा गौरव जगभरात झाला आहे. साहित्य क्षेत्राबरोबरच समाजसेवेतही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मंदिरे, मस्जिद, चर्च, धर्मशाळा तसेच विविध सामाजिक संस्थांना अत्यल्प मानधनात किंवा विनामूल्य लेखा व करसल्लागार सेवा देऊन त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. वर्ष २०२२ मध्ये तब्बल ३६४ धार्मिक व सामाजिक संस्थांचे आर्थिक आणि करसल्लागार कामकाज सांभाळल्याबद्दल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने त्यांची स्वतंत्र विक्रम नोंद केली होती.

व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेले सीए शंकर अंदानी यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डी येथे सलग १८ वर्षे करसल्लागार म्हणून सेवा बजावली आहे. तसेच अहिल्यानगर महानगरपालिका, विविध शासकीय संस्था, बँका, पतसंस्था आणि सामाजिक संघटनांचे लेखापरीक्षक व करसल्लागार म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

# एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी जनजागृती



नगर – स्नेहालय संचलित उमेद प्रकल्प तसेच साऊ एकल महिला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय एकल महिला दिनानिमित्त महिला सक्षमीकरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन बालसंवाद केंद्र, गांधी मैदान, अहिल्यानगर येथे करण्यात आले. झोपडपट्टी भागातील एकल महिलांमध्ये हक्क, सन्मान, स्वाभिमान व स्वावलंबनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. स्नेहालयच्या उमेद प्रकल्पांतर्गत सेवावस्तीतील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसेच आर्थिकदृष्ट्या गरजू अशा ५३० एकल महिलांवर काम केले जात आहे. या महिलांना विविध व्यावसायिक प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी व व्यवसायासाठी पाठबळ देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमास साऊ एकल महिला फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष अशोक कुटे, अल्फा लाव्हल फंडिंग एजन्सीच्या प्रमुख वनश्री वनकर, बालभवन प्रकल्पाच्या मानद संचालिका वैशाली चोपडा, स्नेहालय अनिवासी विभागाचे संचालक हनीफ शेख, सखी सेंटरच्या समन्वयक शबाना शेख तसेच स्नेहालयच्या स्वयंसेविका भावना मखीजा उपस्थित होत्या.

वैशाली चोपडा यांनी एकल महिलांनी स्वतःच्या हक्कांसाठी सक्षमपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

अशोक कुटे यांनी एकल महिला पुनर्विवाहासंदर्भातील नवीन जी.आर.ची माहिती देत पुनर्विवाहाच्या विषयावर मार्गदर्शन केले.

हनीफ शेख यांनी महिला हक्कांविषयी मार्गदर्शन केले.

वनश्री वनकर यांनी एकल महिलांच्या सामाजिक वास्तवावर भाष्य करत प्रेरणादायी विचार मांडले.


शबाना शेख यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित महिलांना दिली.

यावेळी उपस्थित एकल महिलांना ‘नारी सन्मान’ योजनेचे लाभपत्र तसेच घरेलू कामगार कार्डांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमात सात सेवावस्तीतील ७८ महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक यास्मिन शेख यांनी केले.

सूत्रसंचालन व पाहुण्यांची ओळख प्रतीक्षा साळवे यांनी करून दिली, तर आभार प्रदर्शन प्रवीण कदम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजू पांढरे, उषा खोल्लम व बालभवन टीम यांनी परिश्रम घेतले.

# हातोळण गावची पहिली वकील : कीर्ती मिसाळ



नगर – हातोळण, औरंगपूर (ता. आष्टी) येथील कायद्याची पदवी घेणारी पहिली तरुणी म्हणून कीर्ती मिसाळ हिने बहुमान मिळविला. एलएलबीचा नुकताच निकाल लागला असून, तिने घवघवीत यश मिळविले आहे. कीर्ती बाळासाहेब मिसाळ ही सीना नदी काठावरील हातोळण येथील रहिवासी आहे. तिचे प्राथमिक शिक्षण हातोळण, घोगरगाव (ता. श्रीगोंदा) व अहिल्यानगर येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर तिने खडतर परिश्रम घेत अहिल्यानगर लॉ कॉलेजमधून एलएलबीची पदवी घेतली. हातोळण गावातील ती पहिली वकील ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब मिसाळ यांची कन्या आहे. सरपंच भारती मिसाळ यांची भगिनी आहे.

# जिल्ह्यातील तीन लाख विद्यार्थ्यांना मोफत अबॅकस शिक्षण

## माझी शाळा–माझे अबॅकस वेबपेजचे प्रकाशन व उत्कृष्ट शिक्षिकांचा सन्मान




अहिल्यानगर जिल्हा परिषद येथे आयोजित कार्यक्रमात शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील मोफत अबॅकस शिक्षण उपक्रमाच्या वेबपेजचे प्रकाशन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, डॉ. कल्पना घडेकर, डॉ. अमोल बागुल आदी.

नगर – जिल्हा परिषद शिक्षण विभाग, अहिल्यानगर आणि एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमधील सुमारे तीन लाख विद्यार्थ्यांना मोफत अबॅकस शिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या गणितीय क्षमतेचा विकास, मानसिक गणनशक्ती वृद्धिंगत करणे आणि तार्किक विचारक्षमता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी माझी शाळा–माझे अबॅकस उपक्रमाचा समारोप नुकताच जिल्हा परिषद मुख्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादा भाऊ गुंजाळ, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, अॅकॅडमीच्या मार्गदर्शिका डॉ. कल्पना अशोक घडेकर, शिक्षक डॉ. अमोल बागुल उपस्थित होत.

यावेळी उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीची माहिती देणाऱ्या विशेष वेबपेजचे प्रकाशन करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये अबॅकस प्रशिक्षण प्रभावीपणे राबविणाऱ्या उत्कृष्ट अबॅकस शिक्षिका सौ.सुवर्णा ठोकळ यांचा सन्मानचिन्ह व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थितांचा स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारे वृक्ष देऊन गौरव करण्यात आला. यावेळी शिक्षिका स्वाती रेपाळे, अंकिता सानप आदी उपस्थित होत्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले की, ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो विद्यार्थ्यांपर्यंत अबॅकससारखे आधुनिक गणितीय शिक्षण पोहोचविणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. विद्यार्थ्यांची एकाग्रता, स्मरणशक्ती, तार्किक विचार आणि मानसिक गणन क्षमता विकसित करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरला आहे. येणाऱ्या पिढ्यांचे गणितीय भविष्य घडविणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असून अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन जिल्हा परिषद शाळांमध्ये सातत्याने व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅडमी यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, बौद्धिक विकास आणि कौशल्याधारित अध्यापनाच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही हा उपक्रम आदर्श ठरणार असल्याचे मत शिक्षणाधिकारी पाटील यांनी व्यक्त केले.

# कॅलिडोस्कोप

## आता बॅगा 'कॅरीमॅन'वर सोडा



आजच्या काळात इंटरनेटवर दररोज काही ना काही नवीन ट्रेंड किंवा स्टार्टअप व्हायरल होत असतो. कधी एखादा भन्नाट बिझनेस आयडिया लोकांचं लक्ष वेधून घेतो, तर कधी साधी गोष्टही 'सोशल मीडिया'वर मोठी चर्चा बनते. बदलत्या जगासोबत लोकांच्या गरजा, सवयी आणि 'कन्व्हिनियन्स'ची व्याख्याही झपाट्याने बदलत आहे. काही वर्षांपूर्वी विचित्र वाटणाऱ्या गोष्टी आज लोक सहज स्वीकारताना दिसतात. अशाच एका हटके 'स्टार्टअप' मुळे सध्या दिल्लीतले लाजपत नगर 'सोशल मीडिया'वर चर्चेचा विषय ठरत आहे.

दिल्लीतल्या लाजपत नगरमध्ये एक भन्नाट 'स्टार्टअप' सध्या 'सोशल मीडिया'वर चर्चेत आला आहे. 'कॅरीमेन' नावाच्या या 'स्टार्टअप' मध्ये लोकांना फक्त १४९ रुपये प्रति तास देऊन शॉपिंग बॅग उचलण्यासाठी हेल्पर मिळतो. हे हेल्पर फक्त बॅग उचलत नाहीत, तर फूड स्टॉलच्या रांगेत उभे राहणे, ग्राहकांना मेट्रोपर्यंत सोडणे, बसायला जागा शोधून देणे आणि गरज पडल्यास फोल्डिंग खुर्ची लावून देणे अशी कामेही करतात.

'सोशल मीडिया' वर धुमाकूळ

ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होताच लोकांनी मजेशीर प्रतिक्रिया द्यायला सुरुवात केली. एका युजरने लिहिले, हे कॅरीमेन नाही, याला नवरा म्हणतात! तर दुसऱ्याने गंमतीत म्हटले, आईला हे कळले, तर ती मला रिप्लेस करेल. काही लोकांना ही कल्पना खूप स्मार्ट वाटली. गर्दीच्या मार्केटमध्ये शॉपिंग करताना बॅगा सांभाळणे, रांगेत थांबणे यामुळे लोकांचा वेळ आणि दम दोन्ही वाचू शकतात, असे काहींचे मत आहे, तर काही जणांनी या 'स्टार्टअप' ला अनावश्यक म्हटले. ही काही नवीन कल्पना नाही, फक्त स्वस्त मजुरीवर चालणारा व्यवसाय आहे, अशी टीकाही काहींनी केली. शहरांमध्ये अशा 'कन्व्हिनियन्स सर्व्हिसेस' वेगाने वाढताना दिसत आहेत. लोकांचा वेळ वाचवणाऱ्या छोट्या-छोट्या सेवांना आता मोठी मागणी मिळत आहे. त्यामुळे 'कॅरीमेन'सारख्या कल्पना काहींना मजेशीर वाटल्या, तरी काही लोकांसाठी त्या उपयोगाच्या ठरत आहेत.

## ट्रम्प आणि नेत्यानाहू रेडे!



बांगला देशमधील दोन रेडे 'सोशल मीडिया'वर चर्चेचा मुख्य विषय बनले आहेत. या रेड्यांचा स्वभाव आणि त्यांचा शारीरिक आकार आणि रूप ही वैशिष्ट्ये खास ठरली आहेत. लोक या दोघांची तुलना जगातील दोन प्रमुख नेत्यांशी करत आहेत. परिणामी, या रेड्यांना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांची नावे देण्यात आली आहेत.

या रेड्यांना ढाक्याजवळील एका फार्ममध्ये ठेवण्यात आले आहे. तिथे त्यांची एक झलक पाहण्यासाठी लोकांची मोठी गर्दी जमली आहे. लोक या रेड्यांसोबत फोटो आणि सेल्फी काढत आहेत आणि या रेड्यांचे व्हिडीओ व फोटोज 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर खूप व्हायरल होत आहेत. बांगला देशमधील प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, 'डोनाल्ड ट्रम्प' असे नाव असलेल्या रेड्याचे वजन अंदाजे सातशे किलो आहे. त्याची कातडी फिकट रंगाची असून अंगावर सोनेरी केस आहेत. याच शारीरिक वैशिष्ट्यांमुळे लोकांनी त्याची तुलना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी केली आहे. अनेक निरीक्षकांनी गमतीने असे निरीक्षण नोंदवले आहे, की हा प्राणी शारीरिकदृष्ट्या ट्रम्प यांच्यासारखा दिसत असला, तरी त्याचा मूळ स्वभाव मात्र अत्यंत शांत आणि सौम्य आहे. वृत्तानुसार, रेड्याच्या मालकाच्या धाकट्या भावाने त्याला हे नाव दिले आहे. त्याने स्पष्ट केले की, 'अल्बिनो' (पांढऱ्या रंगाच्या) रेड्याचा स्वभाव साधारणपणे शांत असतो; पण त्यांना मुद्दाम चिथवले, तर ते आक्रमक होतात तसेच, या विशिष्ट रेड्याची विक्री यापूर्वीच करण्यात आली असल्याचेही वृत्त आहे.

बेंजामिन नेतन्याहू असे नाव असलेला दुसरा रेडाही 'सोशल मीडिया'वर खूप व्हायरल होत आहे. या रेड्याचे वजन ७५० किलो आहे आणि तो अत्यंत आक्रमक स्वभावाचा आहे. तो वारंवार मोठ्याने हंबरतो आणि लोकांच्या अंगावर धावून जाण्याचा त्याचा स्वभाव आहे.

## रेल्वेची तिकिट बुकिंग क्षमता वाढणार!



भारतात रेल्वेने प्रवास करायचा म्हटले, की अनेकदा तिकीट मिळत नसल्याची तक्रार अनेक प्रवासी करताना दिसतात. भारतात ट्रेनची तिकीटे कधीच वेळेत आणि हवी तशी मिळत नाही अशी तक्रार अनेकांकडून वरचे वर ऐकायला मिळते; मात्र आता तिकीटे न मिळण्याची समस्या निकाली निघणार आहे. भारतीय रेल्वेने यासंदर्भात एक मोठा निर्णय घेतला असून पडद्यामागील अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींमध्ये मोठे बदल केले जात असल्याने तिकीटांची उपलब्धता वाढणार असून तिकीट काढण्यासाठी आता खर्च होणारा वेळ मोठ्या प्रमाणात वाचणार असून प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

भारतीय रेल्वेकडून प्रवासी आरक्षण प्रणालीत मोठे तांत्रिक परिवर्तन करत 'नेक्स्टजेन पीआरएस' प्रणाली लवकरच सुरू केली जाणार आहे. या नव्या प्रणालीमुळे येत्या काळात मिनिटाला ३२ हजारांऐवजी तब्बल दीड लाख रेल्वे तिकिटे बुक होणार आहेत. वाढत्या ऑनलाइन तिकीट बुकिंगच्या पार्श्वभूमीवर रेल्वेने ही तांत्रिक सुधारणा केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रणालीमधील अपग्रेड ऑगस्ट महिन्यापासून प्रत्यक्षात लागू होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.


भारतीय रेल्वेने ४० वर्षांपूर्वी म्हणजेच १९८५ मध्ये दिल्ली येथे पीआरएस प्रणाली सुरू केली होती. १९९९ मध्ये देशव्यापी नेटवर्किंग पूर्ण झाल्यानंतर देशातील कोणत्याही जोडलेल्या आरक्षण केंद्रातून तिकीट आरक्षण, पीएनआर चौकशी आणि तिकीट रद्द करण्याची सुविधा उपलब्ध झाली. दरम्यान, सध्या देशातील जवळपास ऐंशी टक्के रेल्वे तिकिटे रेल्वे पर्यटन आणि 'आयआरसीटीसी' माध्यमातून ऑनलाइन बुक केली जातात.

रेल्वे अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार तिकीट बुकींगचा सर्वाधिक ताण दिल्ली, कोलकाता, मुंबई आणि चेन्नई या भागातून प्रणालीवर येतो. त्यामुळे नव्या प्रणालीसाठी या चार शहरांमध्ये प्रमुख डेटा सेंटर राहणार असून त्याचे सिकंदराबाद येथे 'डिझास्टर रिकव्हरी बॅकअप सेंटर' असणार आहे.

रेल्वेचे तिकीट बुकिंग करताना फॉर्म प्रतिसाद देत नाहीत, क्यूआर कोड पेमेंटला विलंब होतो, तर काही टर्मिनल्स दीर्घ बफरिंगनंतर आपोआप लॉगआऊट होतात, अशा तक्रारी येत आहेत. या समस्या दूर करण्यासाठी इंटरनेट बँडविड्थ वाढवणे, जुने राऊटर्स बदलणे, कम्युनिकेशन नेटवर्क मजबूत करणे आदी कामे हाती घेतली आहेत.

तत्काळ तिकीट आरक्षणाच्या वेळेत सर्व्हरवर मोठा ताण येत असल्याने अनेकदा प्रणालीची गती मंदावणे, व्यवहार अडकणे किंवा अचानक अकाऊंटमधून लॉगआऊट होण्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. या पार्श्वभूमीवर रेल्वेने जुन्या 'कॅरेक्टर यूजर इंटरफेस' आधारित प्रणालीऐवजी अधिक वेगवान 'ग्राफिकल यूजर इंटरफेस' आधारित प्रणाली तयार केली. यामुळे तिकीट बुकींग अधिक वेगवान आणि सोयीस्कर होणार आहे

## प्राणीही करतात रक्तदान




'रक्तदान हे श्रेष्ठदान' असं म्हटलं जातं. रक्तदानामुळे अनेकांचे जीव वाचू शकतात. माणसांना रक्त अगदी सहज उपलब्ध होतं. पण मुक्या जनावरांचं काय, त्यांना रक्त कोण देणार... मुळात जनावरांनाही रक्ताची गरज असते, याचा विचारही आपल्या मनात येणार नाही. पण या मुक्या जीवांनाही आजारपणात रक्त लागतं. काही देशांमध्ये जनावरांसाठी ब्लड बँक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. ब्लड बँक नसणाऱ्या देशांमध्ये ओळखीद्वारे प्राण्यांना रक्त उपलब्ध करून दिलं जातं. काही देशांमध्ये जनावरांसाठी रक्त आणि प्लाज्मा दान उपक्रमांचं आयोजनही केलं जातं. या उपक्रमांमध्ये लोक आपल्या पाळीव प्राण्यांना घेऊन येतात. पाळीव कुत्रा आणि मांजरं रक्तदान करतात. कुत्रा आणि मांजरांमध्येही माणसांप्रमाणेच रक्तगट असतात. कुत्र्यांच्या रक्तगटाचे बारा प्रकार असतात तर मांजरांच्या रक्तगटाचे तीन प्रकार असतात. अमेरिका आणि इंग्लंडमध्ये पशू ब्लड बँक आणि प्लाज्मा सेंटर्स आहेत. पशूंच्या रक्तदानाची प्रक्रिया अगदी सुलभ आहे. या दरम्यान प्राण्यांना भूलही द्यावी लागत नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये प्राण्यांच्या हक्कांबाबत बरीच जागरूकता आहे. त्यामुळे इथले लोक आपल्या पाळीव प्राण्यांना अशा रक्तदान केंद्रांमध्ये घेऊन जातात आणि रक्तदान करवतात. प्राण्यांच्या रक्तदानाचा हा उपक्रम कौतुकास्पद म्हटला पाहिजे.

## म्हणून चोरल्या सायकलच्या सीट




जपानमध्ये एका ६१ वर्षांच्या माणसाने सायकलच्या सीट चोरल्या. त्याच्या घरात सायकलच्या तब्बल १५९ सीट सापडल्या. आता सायकलच्या सीट चोरून त्याला काय मिळालं, हा प्रश्न कोणालाही पडू शकतो. मात्र यामागचं कारण ऐकून तुम्हाला धक्काच बसेल. टोकियोतल्या 'ओटा वार्ड'भागात गेल्या काही दिवसांपासून सायकलच्या सीट्सची चोरी होऊ लागली. मग लोकांनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासलं. त्यात एक माणूस सायकलची सीट चोरून नेत असल्याचं दिसलं. पोलिसांनी या माणसाला शोधून काढलं. त्याच्या घराची झडती घेतली. त्याच्या घरात एक, दोन नाही तर १५९ सीट सापडल्या. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतलं आणि सीट चोरण्याचं कारण विचारलं. त्यावर गेल्या वर्षी आपल्या सायकलची सीट कोणीतरी चोरली. मग सायकलही चोरून नेली. याचा बदला घेण्यासाठी आणि सायकलची सीट चोरल्यावर कसं वाटतं याची जाणीव करून देण्यासाठी आपण इतरांच्या सायकलची सीट चोरायला सुरुवात केल्याचं त्याने सांगितलं. ही सबब ऐकल्यानंतर पोलिसांना हसावं की रडावं हेच कळत नव्हतं.

## सर्वात जुनं हॉटेल



सर्वात जुनं हॉटेल जपानमधलं 'निशियामा ओनसेन कियूनकन' हे जगातलं सर्वात जुनं हॉटेल असल्याचं म्हटलं जातं. फुजिवारा महितो नावाच्या व्यक्तीने इसवीसन ७०५ मध्ये हे हॉटेल बांधलं होतं. आज त्यांच्या घराण्याची ५२ वी पिढी या हॉटेलचा सगळा कारभार सांभाळते आहे. १३०० वर्षांपासून एकच कुटुंब हे हॉटेल सांभाळत आहे. या हॉटेलची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली आहे. या अनोख्या हॉटेलमध्ये रहाण्यासाठी जगभरातून बरेच लोक येतात. हॉटेल परिसरात गरम पाण्याचे झरे आहेत. हे या हॉटेलचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. हा हॉटेलच्या एका बाजूला नदी आहे तर दुसऱ्या बाजूला घनदाट जंगल आहे. निसर्गरम्य परिसरातलं हे हॉटेल अनेकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. या हॉटेलमध्ये ३७ खोल्या आहेत. या खोलीचं एका रात्रीचं भाडं भारतीय चलनात ३३ हजार रुपये आहे. अधूनमधून हॉटेलचं नूतनीकरण केलं जातं. १९९७ मध्ये या हॉटेलचं नूतनीकरण करण्यात आलं होतं.

## इथे पडतो वर्षभर पाऊस!




भारतातील एका गावात वर्षाचे १२ महिने पाऊस पडत असतो. हे ढगांवर तरंगणारे पृथ्वीवरचे सर्वात सुंदर गाव आहे. जगभरातून लोक इथे पावसात भिजण्यासाठी येतात. पावसामुळे हे गाव जगाच्या नकाशावर सर्वात सुंदर पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते.

भारतात चेरापुंजी येथे सर्वात जास्त पाऊस पडतो असे शाळेत सामान्य ज्ञानाच्या विषयात आपण शिकलो. जगातील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण असा विक्रम देखील चेरापुंजीच्याच नावावर आहे; मात्र भारताच्या ईशान्येकडील मेघालय राज्यात वसलेले एक छोटेसे गाव आहे. या गावातदेखील सर्वाधिक पाऊस पडतो. या गावात १२ महिन्यांत सरासरी सुमारे ११ हजार ८७२ मिलीमीटर पावसाची नोंद होते. हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. या गावाचे खास वैशिष्ट्य म्हणजे या गावात जवळपास १२ महिने पाऊस पडतो. मेघालय भारतातील सर्वात सुंदर आणि स्वच्छ राज्य आहे. येथील प्रत्येक लहान गाव वैशिष्ट्यपूर्ण गुणांसाठी ओळखले जाते. मेघालयात असलेले मॉसिनराम हे लहानसे खेडेगाव पृथ्वीवरील सर्वाधिक पर्जन्यमान असलेले ठिकाण म्हणून जगभरात प्रसिद्ध आहे. हे ठिकाण पाहण्यासाठी जगभरातून लोक येतात; मात्र अनेक भारतीयांना या गावाबद्दल माहीत नाही.

मॉसिनराम हे गाव हिरव्यागार टेकड्या, घनदाट जंगल आणि ढगांनी वेढलेले आहे. येथील हवामान साधारणपणे दमट आणि थंड असते. पावसाळ्यात जणू काही ढग पृथ्वीवर उतरले आहेत असे वाटते. सततच्या पावसामुळे जमीन सुपीक होते. यामुळे या गावात वर्षभर हिरवळ पहायला मिळते. मॉसिनराम गावाची भौगोलिक रचना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. बंगालच्या उपसागरातून येणारे बाष्पयुक्त वारे खासी टेकड्यांना धडकतात, तेव्हा ते वर सरकले जातात आणि मुसळधार पावसाच्या रूपात खाली पडतात. पर्वतीय पर्जन्यवृष्टी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रक्रियेमुळेच येथे वर्षभर पाऊस पडतो. सततच्या पावसामुळे येथील लोकांची जीवनशैली सर्वसामान्य ठिकाणांपेक्षा खूपच वेगळी आहे. येथील लोक बांबू आणि पानांपासून बनवलेल्या 'कनुप' नावाच्या विशेष छत्र्या वापरतात. मुसळधार पावसाचा सामना करण्यासाठी घरेसुद्धा तशीच बांधलेली असतात. शेती आणि पशुपालन हे येथील मुख्य व्यवसाय आहेत. येथील लोक कपडे वाळवण्यासाठी विविध तात्पुरत्या उपायांचाही वापर करतात.

मॉसिनरामचा पाऊस येथील लोकांच्या जीवनशैलीतील एक मोठे आव्हान असले तरी निसर्गप्रेमींसाठी हे ठिकाण स्वर्गापेक्षा कमी नाही. मॉसिनरामजवळ असलेल्या मॉझिम्बुइन गुहा नैसर्गिक रचनांसाठी प्रसिद्ध आहेत. हिरवीगार वनराई, धबधबे आणि जमिनीवर अवतरलेले कापसारखे सुंदर ढग.. इथला सुंदर नजारा पाहून पर्यटक हरखून जातात.

## सासूला खांद्यावर घेऊन प्रवास



छत्तीसगडमधील सरगुजा जिल्ह्यातून समोर आलेल्या एका घटनेने सरकारी यंत्रणेच्या दाव्यांवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. वृद्धापकाळ पेन्शन मिळवण्यासाठी एका महिलेने आपल्या ९० वर्षीय सासूला खांद्यावर उचलून अनेक किलोमीटर पायी प्रवास केल्याचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. ही घटना ग्रामीण आणि आदिवासी भागातील लोकांना मूलभूत सरकारी सुविधांसाठी अजूनही किती संघर्ष करावा लागतो, याचे वास्तव दाखवते.

मिळालेल्या माहितीनुसार, वृद्ध महिलेची दरमहा मिळणारी पाचशे रुपयांची पेन्शन केवायसी प्रक्रिया अपूर्ण असल्यामुळे मागील चार महिन्यांपासून थांबवण्यात आली होती. घरातील परिस्थिती अत्यंत कठीण असल्याने कुटुंबाला या पैशांची गरज होती; मात्र बँकेकडून वृद्ध महिलेला प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास सांगण्यात आल्याने सुनेला हा कठीण निर्णय घ्यावा लागला.

सुखमनिया नावाच्या महिलेने आपल्या अशक्त आणि वृद्ध सासूला पाठीवर घेत जंगलमार्ग, खडकाळ रस्ते आणि उष्ण वातावरणातून बँकेपर्यंत प्रवास केला. या प्रवासादरम्यान एका प्रवाशाने हा संपूर्ण प्रकार मोबाईलमध्ये रेकॉर्ड केला. त्यानंतर ही घटना देशभर चर्चेत आली.

व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर 'सोशल मीडिया'वर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. अनेकांनी प्रश्न उपस्थित केला, की सरकार घरपोच सेवा आणि डिजिटल सुविधा उपलब्ध असल्याचा दावा करत असताना आदिवासी भागातील वृद्धांना अजूनही अशा हालअपेष्टा का सहन कराव्या लागतात? विशेषतः बँकिंग, पेन्शन आणि ओळख पडताळणीसारख्या प्रक्रियांमध्ये ग्रामीण भागातील लोकांना अजूनही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

घटना चर्चेत आल्यानंतर प्रशासन आणि बँक अधिकाऱ्यांनी तत्काळ हालचाल केली. बँकेतच केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि थकीत पेन्शनची रक्कम देण्यात आली. काही अहवालांनुसार वृद्ध महिलेला दीड हजार ते दोन हजार रुपयांपर्यंतची थकीत रक्कम मिळाली. अधिकाऱ्यांनी पुढील महिन्यापासून घरपोच पेन्शन सुविधा पुन्हा सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

